सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २३ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ७० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कोचिंग सेंटरला लागलेल्या भीषण आगीत १४ मुलांचा होरपळून मृत्यू !

वृत्तसंस्था

लखनौ : उत्तर प्रदेशची राजधानी लखनौमधील अलीगंज भागात एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील पुरनिया चौकाजवळील एका कोचिंग सेंटरला भीषण आग लागली. या भीषण दुर्घटनेत १४ मुलांचा होरपळून मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृतांच्या कुटुंबियांसाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांनी या घटनेत किमान १४ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. मृत पावलेल्यांमध्ये बहुतांश तरुण मुला-मुलींचा समावेश असल्याचे समजते, जे आग लागली तेव्हा इमारतीमध्ये उपस्थित होते.



धुराच्या साम्राज्यामुळे इमारतीत नेमके किती लोक अडकले आहेत, याबाबत बराच वेळ संभ्रम होता.आग लागताच संपूर्ण इमारतीत वेगाने धूर पसरला. हे पाहून स्थानिक लोकांनी तातडीने अग्निशामक दलाशी संपर्क साधला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीने बघता बघता विक्राळ रूप धारण केले होते. दुर्घटना घडली तेव्हा कोचिंग सेंटरमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आगीच्या ज्वाळा आणि धूर पसरताना पाहून विद्यार्थ्यांमध्ये एकच पळापळ झाली. सर्वत्र किंचाळ्या आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अजूनही काही जण आत अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीलखनौमधील या आगीच्या घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, मृतांच्या कुटुंबियांना आणि जखमींना आर्थिक मदत जाहीर केली आहे.उत्तर प्रदेशातीललखनौ येथे लागलेल्या आगीत झालेल्या जीवितहानीमुळे अत्यंत दुःखी आहे. शोकाकुल कुटुंबियांच्या पाठीशी माझ्या संवेदना आहेत. जखमी झालेले लोक लवकरात लवकर बरे होवोत हीच प्रार्थना. घटनास्थळी बचावकार्य सुरू असून प्रशासन सर्व शक्य ती मदत करत आहे, असे पंतप्रधानांनी 'द' वरील आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.पंतप्रधान कार्यालयाने 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी'मधून ही मदत जाहीर केली आहे. त्यानुसार, प्रत्येक मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.

## प्रत्येक गावात हवामान बसवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवणार : कृषी मंत्री

तभा वृत्तसेवा

मुंबई : फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक भरपाई मिळवून देण्यासाठी राज्यातील प्रत्येक गावात हवामान केंद्र बसवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी केंद्र शासनाकडे लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येईल,असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील हवामान आधारित फळपीक विमा योजनेतील अनियमितता, शेतकऱ्यांना न मिळालेली नुकसानभरपाई आणि प्रलंबित तक्रारींबाबत मंत्रालयात एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत कृषी मंत्री बोलत होते.या बैठकीला आमदार मनीषा चौधरी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे,कृषी संचालक विनयकुमार आवटे,विमा कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. डहाणू आणि बोईसर येथील शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरूनही त्यांची नोंदणी पूर्ण झाली नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी जिल्हाधिकारी पालघर यांनी करण्याचे निर्देश कृषी मंत्र्यांनी दिले. प्रत्येक गावात वेदर स्टेशन उभारण्यासाठी शासन आग्रही आहे. गावागावात हवामान केंद्र झाल्यास, निसर्गाच्या लहरीपणामुळे प्रत्यक्ष झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचा आकडा आणि विम्याचे निकष यांची तंतोतंत जुळवणी करणे शक्य होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल असेही कृषी मंत्री भरणे म्हणाले.

विमा कंपन्या, बँका आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपापसातील समन्वय वाढवून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. कोणताही पात्र शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे कडक निर्देशही कृषी मंत्री भरणे यांनी यावेळी दिले.

## ९७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

### फडणवीस सरकारचा नवा विक्रम; शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी २० हजार ७५२ कोटींची तरतूद

तभा वृत्तसेवा



मुंबई : पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (दि. २२) मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल ९७ हजार ७०६.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहांत सादर करून नवा विक्रम नोंदवला. विशेष म्हणजे चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांतच, इतक्या खर्चाच्या मागण्या सादर झाल्याने विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका सुरू केली आहे. या पुरवणी मागण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, सरकारने नुकतीच घोषणा केलेल्या शेतकरी कर्जमाफीसाठी तब्बल ४० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये आधीच्या कर्जमाफीतील प्रलंबित बोजासाठी २०० कोटी, तर आताच जाहीर करण्यात आलेल्या नव्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' साठी २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

एकूण ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या या स्थूल पुरवणी मागण्या असल्या, तरी विविध तांत्रिक समायोजने आणि केंद्र सरकारच्या मदतीचा परतावा लक्षात घेता, राज्याच्या तिजोरीवर प्रत्यक्ष निव्वळ अतिरिक्त भार ७४ हजार ८१७.६६ कोटी रुपयांचा पडणार आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागासाठी सर्वाधिक २२ हजार ०१५.४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यातील बहुतांश हिस्सा हा शेतकरी कर्जमुक्ती आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल (७७७ कोटी रुपये) देण्यासाठी वापरला जाणार आहे.

कर्जमाफीसोबतच सरकारने शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केली आहे. नगरविकास विभागासाठी तिसऱ्या क्रमांकाची म्हणजेच तब्बल १५ हजार १५२.४३ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. नाशिक-त्र्यंबकेश्र्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याशिवाय, महापालिका क्षेत्रातील मूलभूत सुखसोयी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी नगरपरिषदांना ७७० कोटी, 'अमृत २.०' अभियानांतर्गत शहरांना जलसुरक्षित करण्यासाठी ३ हजार ७६ कोटी आणि 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०' साठी १ हजार कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. कोकण आणि सागरी दळणवळणाला गती देणाऱ्या 'रेवस-रेड्डी सागरी महामार्ग' प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (एमएसआरडीसी) १ हजार कोटी रुपयांचे भागभांडवली अंशदान मंजूर करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या 'राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य' योजनेअंतर्गत महाराष्ट्राला १० हजार ७.१० कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज मिळणार आहे. तसेच 'विकसित भारत-रोजगार हमी' आणि 'अजीविका मिशन (ग्रामीण)' कार्यक्रमासाठी ७ हजार ३६७.३२ कोटी रुपयांची केंद्र आणि राज्याच्या संयुक्त हिश्शयाची तरतूद करण्यात आली आहे.

## पाच तरुणांवर अंत्यसंस्कार; बिडकीन गावावर शोककळा, बाजारपेठ शंभर टक्के बंद

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि. २२ जून : पैठण तालुक्यातील बिडकीन गावातील १९ जिवलग मित्र पर्यटनासाठी १७ जून रोजी रात्री रत्नागिरी जिल्ह्यात रवाना झाले होते. मात्र आनंदासाठी निघालेली ही सहल काही क्षणांत दुःखद ठरली. गणपतीपुळे समुद्रकिनारी समुद्राच्या लाटांमध्ये ओढले गेल्याने बिडकीन येथील पाच अविवाहित तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण बिडकीन गावावर शोककळा पसरली आहे. शनिवारी सकाळी गणपतीपुळे समुद्रकिनारी पोहोचल्यानंतर काही तरुण समुद्राच्या पाण्यात उतरले. मात्र समुद्रातील वाढता ओढा आणि प्रचंड लाटांचा अंदाज न आल्याने पाच जण खोल पाण्याकडे ओढले गेले. घटनेनंतर सहकाऱ्यांसह उपस्थित पर्यटकांनी मदतीसाठी धाव घेतली. शोध मोहिमेनंतर पाचही मृतदेह हाती लागले. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रविवारी दुपारी मृतदेह बिडकीनकडे रवाना करण्यात आले. सोमवारी सकाळी सुमारे ७ वाजता शववाहिकेतून पाचही मृतदेह बिडकीन येथे आणण्यात आले. त्यानंतर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. बिडकीन येथील स्मशानभूमीत प्रेम आदमाने, यश कांबळे, आनंद नरवडे आणि आदित्य राऊत यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले, तर सोमपुरी येथे अनिकेत हिवराळे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंत्यसंस्कारासाठी राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, तरुण वर्ग तसेच हजारो ग्रामस्थ उपस्थित होते. या दुःखद घटनेमुळे बिडकीन गावात कमालीची शांतता पसरली असून गावातील संपूर्ण बाजारपेठ शंभर टक्के बंद ठेवण्यात आली. सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून गावकऱ्यांनी मृत तरुणांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## १२ वर्षीय मुलाकडून ९ महिन्याच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

वृत्तसंस्था



गोरखपूर : उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. १२ वर्षीय मुलाने अवघ्या ९ महिन्यांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे.

आरोपीने अत्याचारापूर्वी गोबाईलवर अश्र्लील व्हिडीओ पाहिल्याची माहिती समोर आली असून, या घटनेनंतर अल्पवयीन मुलांमध्ये अश्र्लील साहित्याच्या वाढत्या संपर्काबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोरखपूरमधील गुलरिहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी रात्री ही घटना घडली. पीडित बालिका आपल्या आईजवळ झोपलेती असताना आरोपीने तिचे अपहरण केले. त्याने घरापासून काही अंतरावर असलेल्या एका शेतात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. नंतर तिला गंभीर जखमी व बेशुद्ध अवस्थेत तिथेच सोडून पळ काढला. शनिवारी पहाटेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केल्यानंतर सुमारे ५०० मीटर अंतरावर शेतातील शेडजवळ ती गंभीर जखमी अवस्थेत आढळून आली. तिच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले असून तिची प्रकृती चिंताजनक आहे.

आरोपी हा पीडित कुटुंबाचा नातेवाईक असून काही दिवसांपूर्वीच चंदीगडहून येथे आला होता. पोलीस चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्याने अश्र्लील व्हिडिओ पाहिले होते आणि घटनेच्या वेळी तो दारूच्या नशेत होता, अशी धक्कादायक कबुली त्याने पोलिसांना दिली आहे.

## आत्मविश्वास असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही : मुख्यमंत्री रेखा गुप्ता

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : योग्य संधी, मार्गदर्शन आणि आत्मविश्र्वास असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नसते याची प्रचिती दीपस्तंभच्या यशोत्सव कार्यक्रमातून येत असल्याचे प्रतिपादन दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी केले. दीपस्तंभ फाउंडेशनतर्फे राजधानी दिल्लीत 'यशोत्सव २०२६' या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी दिव्यांग, अनाथ, ट्रान्सजेंडर तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्यमंत्री रेखा गुप्ता, खा. विनोद तावडे यांच्यासह विनय सहस्रबुद्धे, केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील उपसचिव इरा सिंघल, वरिष्ठ आयएएस अधिकारी अय्याज तांबोळी, दीपस्तंभ फाउंडेशनचे प्रमुख यजुवेंद्र महाजन प्रामुख्याने उपस्थिती होते.या प्रसंगी दीरपस्तंभ फाउंडेशनच्या मनोबल प्रकल्पातून यशस्वी झालेले मनोज पाटील (आयपीएस), बापूसाहेब गायकवाड (आयपीएस), सूरज तिवारी (आयएएस), रेणुका केकन (आयआरएस), अक्षय पवार (आयएफएस), शुभम पाटील (आयएफएस), विशाल कुमार आनंद, हृषिकेश पवार (एसटीआय), प्रणाली धवन, दिलराज मीणा, पंकज गिरासे आणि मंगल भिवंडीकर यांच्यासह अनेक यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

इरा सिंघल या २०१४ बॅचच्या आयएएस अधिकारी आहे. दिव्यांग असून त्यांनी कुठलेही आरक्षण न घेता भारतातून प्रथम क्रमांक मिळवला होता. त्या स्कोलियोसिस आजाराने ग्रस्त आहेत. स्कोलियोसिसमध्ये पाठीचा कणा सरळ नसून एका बाजूला वाकलेला असतो. त्यांच्याबद्दलची एक आठवण सांगताना रेखा गुप्ता म्हणाल्या की, काही वर्षांपूर्वी इरा सिंघल दिल्लीच्या एका झोनच्या उपायुक्त होत्या आणि मी नगरसेविका होते. सर्व आव्हानांवर मात करून दिल्लीतील विविध प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्या धडपडत होत्या. त्या ज्या पद्धतीने काम करत होत्या, धडाडीने प्रकल्पांची पाहणी करायच्या आणि ५०-६० अधिकारी त्यांच्या मागे असायचे. त्याचे कौतुक तेव्हाही वाटत होते आणि आजही वाटते. हे एक उदाहरण आहे आणि अशा सगळ्याच लोकांचे कार्य अनेकांना प्रेरणादायी असल्याचेही रेखा गुप्ता म्हणाल्या

## पदाधिकाऱ्यांना अयोध्या न सोडण्याचे आदेश; राम मंदिर निधी अपहार प्रकरणी एसआयटीचा निर्णय

वृत्तसंस्था

अयोध्या : राम मंदिरनिधीमधील अपहार आणि घोटाळ्याचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) मंदिर ट्रस्टचे विश्र्वस्त आणि महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांना अयोध्या सोडून न जाण्याचे निर्देश दिले आहेत. मंदिर सूत्रांनी रविवारी ही माहिती दिली. तीन सदस्यीय 'एसआयटी'ने रविवारी लखनौकडे रवाना होण्यापूर्वी हे कडक निर्देश दिले आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रस्टचे अधिकारी आणि तपासाशी संबंधित इतर व्यक्तींच्या चौकशीसह दैनंदिन तपासाचे अहवाल डिजिटल स्वरूपात जतन करण्यात आले आहेत.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथयांच्याकडे सादर करण्यापूर्वी या अहवालाला अंतिम रूप दिले जाईल. यासोबतच, 'एसआयटी' आपल्या निष्कर्षांचा अहवाल दररोज मुख्यमंत्री कार्यालयाला पाठवत आहे.हा तपास केवळ निधीच्या अपहारापुरता मर्यादित नसून, मंदिर ट्रस्टने वेगवेगळ्या टप्प्यांत केलेली जमीन खरेदी आणि मंदिरासाठीच्या बांधकाम साहित्याची खरेदी या मुद्द्यांपर्यंतही विस्तारला आहे. ट्रस्टने बाजारभावापेक्षा अधिक दराने जमिनी खरेदी केल्याचा आरोप असून, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्षासह विविध राजकीय पक्षांनी हा मुद्दा आक्रमकपणे लावून धरला होता.

तीन सदस्यीय 'एसआयटी' अयोध्या राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांनंतर, स्वतः मंदिर ट्रस्टने केलेल्या विनंतीवरून उत्तर प्रदेश सरकारने १३ जून रोजी या 'एसआयटी'ची स्थापना केली होती. या तीन सदस्यीय विशेष तपास पथकामध्ये लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्र्वास पंत, पोलिस महानिरीक्षक किरण एस. आणि वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे.



तीन सदस्यीय 'एसआयटी'
अयोध्या राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांनंतर, स्वतः मंदिर ट्रस्टने केलेल्या विनंतीवरून उत्तर प्रदेश सरकारने १३ जून रोजी या 'एसआयटी'ची स्थापना केली होती. या तीन सदस्यीय विशेष तपास पथकामध्ये लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत, पोलिस महानिरीक्षक किरण एस. आणि वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे.

## छत्रपती संभाजीनगर

## सोन्याबाबत संभ्रम

नवी दिल्ली : पश्चिम आशियात अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यात तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ चाललेल्या संघर्षाला अलीकडेच 'विराम' लागल्यानंतर जागतिक वित्तीय बाजाराला दिलासा मिळाला. युद्धाच्या काळात सुरक्षित गुंतवणूक म्हणून मिरवणाऱ्या सोन्याच्या किंमतीत लक्षणीय चढ-उतार झाले पण, आता संघर्ष संपण्याची चिन्हे दिसू लागल्यानेयेत्या काही महिन्यांतसोन्याच्या किमतीत वाढणार की घसरणार?गुंतवणूकदारांच्या मनात हा सर्वात मोठा प्रश्न आहे. श्रिचम आशियात युद्धाचा भडका उडाल्यापासून सोन्याच्या किमतीत बरेच चढ-उतार झाले ज्यामुळे गुंतवणूकदार तसेच, खरेदीदारांची धाकधूक वाढली आहे .

## तीन दिवस बँक बंद

मुंबई : या आठवड्यात तुम्हाला बँकेशी संबंधित कोणतेही महत्त्वाचे काम असेल ज्यासाठी तुम्हाला बँकेच्या शाखेत जायचे असल्यास तर, घरातून निघण्यापूर्वी तुमचे कॅलेंडर नक्की तपासा. बँक ग्राहकांनी आपल्या जवळच्या शाखेला भेट देण्याआधी सुट्ट्यांबद्दल जाणून घेतले पाहिजे. स्टेट बँक ऑफ इंडिया, खउखउख बँक, एचडीएफसी बँक आणि इतर सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बँकांमध्ये बँकिंग-विषयक कामांचे नियोजन करणाऱ्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (ठइख) सुट्ट्यांचे वेळापत्रक आधीच तपासून पहावे जेणेकरून फेरी वाया जाणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या हॉलिडे लिस्टनुसार २२ जून ते २८ जून २०२६ या आठवड्यात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँकांमध्ये तीन दिवस कामकाज बंद असेल पण, या दरम्यान डिजिटल बँकिंग सेवा सुरळीत सुरू राहील. देशाच्या विविध राज्यातील बँकांमध्ये २६, २७ आणि २८ जून रोजी सुट्ट्या असतील.

## हवामानाचा समतोल बिघडला

नवी दिल्ली : देशात मान्सूनचे आगमन झाले असले तरी अल-निनोच्या विळख्यामुळे हवामानाचा समतोल पूर्णपणे बिघडला आहे. पूर्व आणि मध्य भारतात कोरड्या हवामानामुळे तीव्र जलसंकट निर्माण होत असताना, ईशान्य भारतातील चेरापुंजी आणि मौसिनराममध्ये मात्र ढगफुटीसदृश पाऊस झाला आहे. भारतात २०२६ चा मान्सून हंगाम सुरू होताच हवामानाचा एक विचित्र प्रकार दिसून येत आहे. एकीकडे, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि मध्य भारतातील अनेक भागात तीव्र उष्णतेची लाट निर्माण झाली आहे, जिथे तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. दुसरीकडे, ईशान्य भारतातील मेघालयातील मौसिनराम आणि चेरापुंजीसारख्या भागात विक्रमी पाऊस पडत आहे.

## सोने किती बाळगायचे ?

नवी दिल्ली : कायद्यानुसार घरात किती सोने ठेवायचे यावर कोणतीही मर्यादा निश्चित नाही. पण तुम्ही उत्पन्नाचा कायदेशीर स्रोत किंवा वारसा हक्काने सोने मिळाले असेल तर तुम्ही तुमच्या इच्छेनुसार कितीही सोने बाळगू शकता. अशा प्रक्रारे, CBDT च्या मर्यादेनुसार, ४ जणांचे कुटुंब कोणत्याही बिला शिवाय ९५० ग्रॅम पर्यंत सोने बाळगू शकते. त्याचप्रमाणे, आयकर विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कुटुंबातील सदस्यांसाठी सवलतीची मर्यादा पुढील प्रमाणे विभागली आहे. कुटुंबात चार सदस्य - पती, पत्नी, एक अविवाहित मुलगा आणि १ अविवाहित मुलगी - असतील तर, तुमच्या घरात पुराव्याशिवाय ९५० ग्रॅम सोने (५०० ग्रॅम + १०० ग्रॅम + १००० ग्रॅम + २५० ग्रॅम) असणे स्वाभाविक आणि वैध मानले जाईल. म्हणजे इतक्या सोन्याच्या होल्डिंगवर आयकर विभाग कारवाई करू शकणार नाही.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मराठी झी 5ची नवी सीरिज 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय'

**छत्रपती संभाजीनगर :** प्रेम, महत्त्वाकांक्षा, सत्तासंबंधआणि आत्मसन्मान यांचा वेध घेणाऱ्या 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' या नव्या ओरिजिनल सीरिजचीघोषणा मराठी झी5ने केली आहे. सिद्धार्थ मेनन आणि जान्हवी उदय यांच्या प्रमुखभूमिका असलेल्या या सीरिजचे दिग्दर्शन गौरव पत्की आणि निर्मिती निर्मिती क्रिएटिव्हमाइंड प्रॉडक्शन्स यांनी केले आहे. कॉर्पोरेट जगतातील नियम आणि मनातील भावनांमध्येअडकलेल्या दोन सहकाऱ्यांची ही भावनिक कथा आहे. कामाच्या ठिकाणी फुलणारे प्रेम, त्यासोबतयेणारी गुंतागुंत आणि स्वतःच्या अस्तित्वासाठीचा संघर्ष यांची प्रभावी मांडणी या सीरिजमध्येपाहायला मिळणार आहे. -

## 29 पैकी फक्त 1 जण घाबरून निर्णय घेतो – मड्रेक्स सर्वेक्षण

**मुंबई,:** भारतातील 6,000 पेक्षा अधिक सक्रिय क्रिप्टो ट्रेडर्स आणि गुंतवणूकदारांवर करण्यात आलेल्या नवीन सर्वेक्षणातून समोर आले आहे की महाराष्ट्र भारतातील सर्वात स्थिर आणि शिस्तबद्ध क्रिप्टो बाजारांपैकी एक आहे. बाजारात मोठे बदल झाल्यास राज्यातील केवळ 3.2% क्रिप्टो ट्रेडर्स घाबरून निर्णय घेत असल्याचे आढळले. हे प्रमाण राष्ट्रीय सरासरी 9% पेक्षा निम्म्याहून कमी असून देशातील सर्वात कमी प्रमाणांपैकी एक आहे.महाराष्ट्रातील सुमारे 29 ट्रेडर्सपैकी फक्त 1 जण बाजारातील अस्थिरतेला घाबरून प्रतिक्रिया देतो, तर देशाची सरासरी 10 पैकी 1 अशी आहे. बाजारात मोठी हालचाल झाल्यास महाराष्ट्रातील बहुतांश ट्रेडर्स संतुलित पद्धतीने आपल्या पोर्टफोलिओमध्ये बदल करतात, संयमाने परिस्थिती पाहतात किंवा घाईघाईने निर्णय घेण्याचे टाळतात.

## योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ च्या निमित्ताने, भारताच्या सवयी लावणाऱ्या वेलनेस प्लॅटफॉर्म, हॅबिल्डने आपला १० वा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. या यशावर भाष्य करताना, हॅबिल्डचे सह-संस्थापक सौरभ बोथरा म्हणाले: "आमचा १० वा जागतिक विक्रम गाठणे हे केवळ आकड्यांपुरते मर्यादित नाही; हे एका वाढत्या चळवळीचे प्रतिबिंब आहे, ज्यात लोक परिपूर्णतेपेक्षा शाश्वततेला प्राधान्य देत आहेत. आंतरराष्ट्रीय योग दिन आपल्याला योगाचे महत्त्व पटवून देतो, परंतु खरा बदल तेव्हाच घडतो जेव्हा योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनतो. 'प्रत्येक घरात योग. दररोज योग' या उपक्रमाद्वारे, आम्ही लाखो लोकांना अशा सवयी निर्माण करण्यास मदत करत आहोत, ज्या दीर्घकालीन आरोग्य, निरोगीपणा आणि निरोगी वृद्धत्वाला साहाय्य करतात."

## पुणे सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन केले

**पुणे :** सात दशकांहून अधिक काळाचा अभियांत्रिकी वारसा असलेली आणि विमान कॅबिन इंटिरिअर्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी जामको इंटिरिअर्सने आज भारतातील पुणे येथे आपल्या अगदी नवीन सेंटर ऑफ एक्सलन्स चे उद्घाटन केले. ही अभियांत्रिकी सुविधा जामको इंटिरिअर्सच्या जागतिक विस्तार धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरते आणि भारताला तिच्या जगभरातील अभियांत्रिकी नेटवर्कचा एक प्रमुख आधारस्तंभ बनवते. देशातील सर्वाधिक विकसित उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) आणि अभियांत्रिकी केंद्रांपैकी एका ठिकाणी उभारण्यात आलेली ही सुविधा महाराष्ट्रातील एरोस्पेस आणि प्रगत अभियांत्रिकी परिसंस्थेच्या सातत्यपूर्ण विकासाला हातभार लावेल. हे सेंटर ऑफ एक्सलन्स संकल्पना विकास, प्रणाली रचना, सविस्तर डिझाइन, प्रमाणन सहाय्य, ड्रॉइंग रिलीज आणि कॉन्फिगरेशन नियंत्रण यांचा समावेश असलेल्या विमान कॅबिनच्या संपूर्ण उत्पादन अभियांत्रिकीची जबाबदारी हाती घेईल. हे केवळ सहाय्यक किंवा आउटसोर्सिंग कार्य नाही; ते संपूर्ण उत्पादन मालकीचे प्रतिनिधित्व करते आणि जामको इंटिरिअर्सच्या जागतिक अभियांत्रिकी संघटनेत अखंडपणे समाविष्ट आहे. हे केंद्र महाराष्ट्रातील कुशल अभियांत्रिकी प्रतिभांना जागतिक स्तरावर प्रमाणित एरोस्पेस कार्यक्रम तसेच प्रगत उत्पादन विकास उपक्रमांमध्ये थेट सहभाग नोंदवून योगदान देण्याची संधी प्रदान करेल.

## भागीदारी आणि जागतिक विस्ताराला चालना दिली

**नवी दिल्ली :** बांधकाम साहित्य, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांसाठीचे भारतातील प्रमुख प्रदर्शन, भारत बिल्डकॉन २०२६, नवी दिल्लीतील यशोभूमी येथे यशस्वीरित्या संपन्न झाले, ज्यामुळे जागतिक उत्पादन आणि सोर्सिंग केंद्र म्हणून भारताचे स्थान पुन्हा एकदा अधोरेखित झाले. या चार दिवसीय कार्यक्रमात जगभरातील ४०,००० हून अधिक अभ्यागत, प्रतिनिधी आणि खरेदीदारांनी सहभाग घेतला, ज्यामुळे भारतीय उत्पादक आणि पुरवठादारांसाठी अभूतपूर्व व्यावसायिक संधी निर्माण झाल्या. ३० हून अधिक देशांतील आणि भारतातील १०० हून अधिक शहरांतील सहभागींसह, भारत बिल्डकॉन २०२६ ने बांधकाम साहित्य परिसंस्थेसाठी देशाचे 'एक राष्ट्र, एक प्रदर्शन' व्यासपीठ बनण्याची आपली संकल्पना यशस्वीरित्या साकार केली.

## नोवा 100 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार

**नवी दिल्ली :** ई2ई रेल ची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या 'नोवा कंट्रोल टेक्नोलिक्स' ने पुढील काही वर्षांत अत्याधुनिक रेल्वे सुरक्षा प्रणालींच्या संशोधन आणि विकासासाठी १०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. रेल्वे सिग्नलिंग, ट्रेन प्रोटेक्शन (गाडी संरक्षण प्रणाली) आणि ऑपरेशनल टेक्नॉलॉजीसायबर सुरक्षा या क्षेत्रांत स्वदेशी क्षमता बळकट करण्यावर कंपनीचा भर आहे. भारतीय रेल्वेकडून 'कवच' ) प्रणालीची अंमलबजावणी वेगवान केली जात असताना आणि रेल्वे कामकाजाचे डिजिटलायझेशन विस्तारले जात असताना ही घोषणा करण्यात आली आहे; यामुळे रेल्वे सुरक्षेचा एक मुख्य घटक म्हणून सायबर सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. "रेल्वे सुरक्षेमध्ये मूलभूत बदल होत आहेत. 'कवच'सारख्या तंत्रज्ञानाने ट्रेन प्रोटेक्शन क्षमता लक्षणीयरीत्या बळकट केल्या असल्या तरी, सिग्नलिंग, ट्रेन कंट्रोल आणि ऑपरेशनल सिस्टम्सच्या वाढत्या डिजिटलायझेशनमुळे उद्योगासमोर एक नवीन आवश्यकता निर्माण झाली आहे," असे ई२ई रेल आणिनोवा कंट्रोल टेक्नोलॉजिक्स चे संचालक व सीईओ सौरजित मुखर्जी यांनी सांगितले.

# योग ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली; बॉटनिकल गार्डनमध्ये विशेष योग शिबिर उत्साहात

## मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती; शेकडो नागरिकांचा सामूहिक योगाभ्यासात सहभाग

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बाळासाहेब ठाकरे उद्यान (बॉटनिकल गार्डन) येथे आयोजित विशेष योग शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. राज्याचे मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या उपक्रमात शेकडो नागरिकांनी सामूहिक योगाभ्यास करत निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

कार्यक्रमाला माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करताना, योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य जीवनपद्धती असल्याचे सांगितले. योगामुळे शारीरिक आरोग्यासोबत मानसिक संतुलन, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होते. त्यामुळे प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी समाजनिर्मितीस




हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा सत्रांचे आयोजन करण्यात आले. सकाळच्या प्रसन्न वातावरणात उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यास केला. यामुळे संपूर्ण बॉटनिकल गार्डन परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता.

या प्रसंगी विवेक देशपांडे, डॉ. उत्तमराव काळवणे, संजय औरंगाबादकर, कैलास जाधव, दिनेश देशपांडे, सुरेश देशपांडे, आनंदजी अग्रवाल, वर्षाताई देशपांडे, भाऊ सुरडकर, शिवाजी दांडगे, विश्वनाथ स्वामी, माधुरीताई अदवंत, मीनाताई खरात, मयूर वंजारी, गणेश नावंदर, गोकुळ मलके, राजू वाडेकर, प्रशांत नांदेडकर, नितीन खरात, अरुण पालवे, अविनाश पवार, रोहित स्वामी, सुधीर शेवाळे, हुशारसिंग चव्हाण, विशाल खंडागळे, आकाश अंतरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या योग शिबिराच्या माध्यमातून योगाचे महत्त्व अधिक व्यापकपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचले असून आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती करण्याचा उद्देश सफल झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# ऑपरेशन ऑल आऊट अंतर्गत बिडकीन पोलिसांची धडक कारवाई

## 2 गावठी कट्टे व 4 जिवंत काडतुसे जप्त, दोन संशयित ताब्यात

तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि. २२ जून :** बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगून दहशत माजविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध सुरू असलेल्या 'ऑपरेशन ऑल आऊट' मोहिमेअंतर्गत पोलिसांनी धडक कारवाई करत दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून दोन गावठी कट्टे, चार जिवंत काडतुसे आणि मोटारसायकल असा एकूण १ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, काही व्यक्ती विनापरवाना घातक



शस्त्रे बाळगून गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी पोरगाव ते निलजगाव मार्गावर सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले.ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांची नावे १) आकाश रमेश निकम (वय ३२), रा. कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर, ह.मु. पिंपळवाडी पिराची, ता. पैठण.२) लखन छोटीराम राठोड (वय ३०), रा. डोणगाव तांडा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर. दोघांची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून एक देशी बनावटीची पिस्टल, एक देशी बनावटीचा गावठी कट्टा, चार जिवंत काडतुसे तसेच हिरो एचएफ डिलक्स मोटारसायकल असा एकूण १,२२,००० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. याप्रकरणी दोन्ही संशयितांविरुद्ध बिडकीन पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून , वरील कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे, योगेश नाडे,निकम, मगर, यांनी केले पुढील तपास पो हे कॉ अजित शेकडे करत आहे .

# ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन व फादर्स डे उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

**बिडकीन , दि. २२ :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन व फादर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे क्रीडा शिक्षक धम्मसागर सर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, योगामुळे होणारे शारीरिक व मानसिक फायदे तसेच निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व याविषयी

सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनीही आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व सांगून योगाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर धम्मसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. यामध्ये ताडासन, त्रिकोणासन, पादहस्तासन, भद्रासन, वज्रासन, अनुलोम-विलोम, प्राणायाम आदी योगप्रकारांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यासाचा आनंद घेतला. तसेच फादर्स डे निमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या वडिलांविषयी कृतज्ञता व्यक्त करत भाषणे सादर केली. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या वडिलांसाठी आकर्षक शुभेच्छापत्रे (ग्रीटिंग कार्ड) तयार करून त्यांच्यावरील प्रेम व आदर व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुटुंबीयांविषयी आदर, प्रेम आणि जिव्हाळ्याची भावना वृद्धिंगत झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एडीवायपीयूकडून इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक (एआय) प्रोग्रामची घोषणा

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) हा उद्योगाभिमुख पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याची घोषणा केली आहे. ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ पासून या अभ्यासक्रमाची पहिली बॅच सुरू होणार असून विद्यार्थ्यांना यूजीसी-मान्यताप्राप्त पदवीसोबतच आधुनिक एआय तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळणार आहे.



भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांसह बारावीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार आहे. या सहयोगाअंतर्गत एडीवायपीयूकडून निवासी कॅम्पस, शैक्षणिक सुविधा आणि पदवी प्रदान केली जाईल, तर यूजीएसओटी उद्योग क्षेत्राशी निगडित शिक्षण अनुभव उपलब्ध करून देईल.

अभ्यासक्रमाची खास वैशिष्ट्ये म्हणजे जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये कार्यरत अभियंत्यांकडून मार्गदर्शन, दर सहा महिन्यांनी अद्ययावत होणारा एआय-फर्स्ट अभ्यासक्रम, पहिल्या सत्रापासून कोडिंग आणि प्रॉडक्ट-बिल्डिंग प्रकल्प तसेच उद्योग क्षेत्रातील संस्थापक, सीएक्सओ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी नियमित संवाद. याशिवाय विद्यार्थ्यांना अपग्रॅडच्या ३,००० हून अधिक हायरिंग पार्टनर्सच्या नेटवर्कचा लाभ मिळणार आहे.

यावेळी अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपचे चेअरमन तथा एडीवायपीयूचे चान्सलर डॉ. अजिंक्य डीवाय पाटील यांनी शिक्षणाला भविष्यातील गरजांशी सुसंगत बनविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. तर अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीचे सीईओ विश्व मोहन यांनी उद्योगांच्या अपेक्षांनुसार कौशल्याधारित अभियांत्रिकी शिक्षण देणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

देशात दरवर्षी मोठ्या संख्येने अभियंते पदवीधर होत असले तरी एआय, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि प्रगत सॉफ्टवेअर अभियांत्रिकीसारख्या क्षेत्रांमध्ये कौशल्यांची कमतरता जाणवते. ही दरी भरून काढण्यासाठी हा इंडस्ट्री-इंटिग्रेटेड आणि एआय-केंद्रित अभ्यासक्रम महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे संस्थांकडून सांगण्यात आले.

# 'मर्दिनी'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित; मातृत्व, संघर्ष आणि न्यायासाठीच्या लढ्याची प्रभावी कथा

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आशयप्रधान मराठी चित्रपटांच्या यादीत आणखी एका दमदार चित्रपटाची भर पडणार असून 'मर्दिनी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. पोस्टर आणि टीझरनंतर आता ट्रेलरमुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिक वाढली आहे. श्रेयस तळपदे प्रस्तुत आणि ॲफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. व ओडीआय ग्रुप निर्मित 'मर्दिनी' हा चित्रपट एका आईच्या प्रेम, वेदना आणि संघर्षाची कथा मांडतो. आपल्या मुलीवर आलेल्या संकटानंतर एका सामान्य आईच्या आयुष्यात घडणारी उलथापालथ आणि न्यायासाठी ती उभी करत असलेली लढाई ट्रेलरमध्ये प्रभावीपणे दाखवण्यात आली आहे.

"आई तारी तिला कोण मारी" या आशयाला अधोरेखित करत ट्रेलर मातृत्वाची ताकद आणि स्त्रीशक्तीचा वेगळा पैलू उलगडतो. भावनिक प्रसंगांसोबतच रहस्य, थरार आणि न्यायासाठीचा संघर्ष यामुळे ट्रेलर शेवटपर्यंत खिळवून ठेवतो.

अभिनेत्री प्रार्थना बेहेरे हिने साकारलेली आईची भूमिका चित्रपटाचा केंद्रबिंदू असून अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले आणि बालकलाकार मायरा वैकुळ यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. दिग्दर्शक अजय मयेकर यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून ट्रेलरला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, दि.२२ :** बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे औचित्य साधून महात्मा गांधी मिशन, एमजीएम विद्यापीठाच्या योग विज्ञान विभाग, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित योग उत्सव कार्यक्रम विद्यापीठाच्या चिंतनगाह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



या कार्यक्रमात आयुष्य मंत्रालय भारत सरकार द्वारा सूचित पूरक हालचाली, योगासने, प्राणायाम व ध्यान यांचा सराव योगशिक्षक गंगाप्रसाद खरात यांनी करून घेतला. यावेळी कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रशिक्षण वर्गामध्ये आयुष्य मंत्रालय भारत सरकार यांच्याद्वारे दिलेल्या मार्गदर्शन सुचनानुसार एक तासांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये सूक्ष्म आसणे, योगासने, ध्यान, प्राणायाम आदींचा समावेश होता.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहात साजरा होणारा आंतरराष्ट्रीय योग दिवस या वर्षीसुद्धा योग विज्ञान, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडून योग आठवडा हा उपक्रम राबविण्यात आला होता. भारत सरकारच्या आयुष विभागांतर्गत यावर्षीची संकल्पना निरोगी वृद्धत्वासाठी योग" (Yoga for Healthy Ageing) ही आहे.

# 'सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिकेचा नवा डिजीटल प्रवास

## 20 जून पासून 'मराठी वारसा' यूट्यूब वाहिनीवर

छत्रपती संभाजीनगर - अल्पावधीत प्रेक्षकांच्या मनात आपलं स्थान मिळविणारी 'सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिका आता नव्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. महाराष्ट्राच्या घराघरांत स्थान मिळवलेली ही मालिका २० जूनपासून 'मराठी वारसा' या लोकप्रिय यूट्यूब वाहिनीवर पहायला मिळणार आहे.

'मराठी दूरचित्रवाणीच्या इतिहासात प्रथमच एखादी मालिका अशा स्वरूपात पुनरागमन करत आहे. फुले दांपत्यांनी समाजपरिवर्तनासाठी दिलेला लढा, शिक्षणाची क्रांती आणि समतेचा संदेश नव्या पिढीपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचावा, हाच या पुनर्प्रवासामागील आमचा उद्देश आहे. ही मालिका केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून सामाजिक जाणीव जागवणारी आणि प्रेरणा देणारी चळवळ आहे', असे या मालिकेच्या डिजीटल प्रवासाबद्दल माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत असे डॉ.अमोल कोल्हे यांनी सांगितले.

याबाबत बोलताना ते म्हणाले, 'सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिकेचा हा डिजीटल प्रवास अनेक निर्मात्यांसाठी पथदर्शी ठरू शकतो. या प्रवासाला विविध स्तरांतून पाठिंबा मिळत असून अनेक मान्यवरांनी आणि हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या आहेत. या उपक्रमाबद्दल सकारात्मक भावना आणि उत्सुकता निश्चितच आहे. डिजीटल प्लॅटफॉर्मवर अभिव्यक्तीची आणि मांडणीची अधिक व्यापक संधी उपलब्ध असते. त्यामुळे प्रेक्षकांपर्यंत कथा ज्या स्वरूपात पोहोचवायची आहे, ती अधिक प्रभावीपणे मांडता येते. तसेच, या विषयाला व्यापक स्वरूप देण्यासाठी आपण भविष्यात संसदेतही हा मुद्दा मांडणार असल्याचे संकेत डॉ.अमोल कोल्हे यांनी दिले. 'सध्या ही मालिका सर्वप्रथम 'मराठी वारसा' या लोकप्रिय यूट्यूब वाहिनीवर पहायला मिळणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर डिजीटल माध्यमांवर विस्तार करण्याचा आमचा विचार आहे. प्रत्येक प्लॅटफॉर्मसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात येत असून योग्य वेळेनुसार पुढील निर्णय घेतले जातील.

# विश्वकर्मा समाजाचा गुणवंतांचा गौरव; 100 हून अधिक विद्यार्थ्यांचा सत्कार

## 10 मान्यवरांना 'समाजभूषण' पुरस्कार; शिक्षण व समाजसेवेचा प्रेरणादायी संगम

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** समाजाच्या प्रगतीचा पाया शिक्षणात असून गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान म्हणजे उज्ज्वल भविष्याचा गौरव असल्याचा संदेश देणारा विश्वकर्मा वंशीय समाज संघटना, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व समाजरत्न गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थी, पालक, समाजबांधव आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला, तर विविध क्षेत्रांत समाजासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या १० मान्यवरांना 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर पांचाळ होते. संत नरहरी महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजय शहाणे यांनी उद्घाटक म्हणून उपस्थिती दर्शविली. प्रमुख अतिथी म्हणून गरुड झेप अकादमीचे संचालक नीलेश सोनवणे, प्राचार्य तानाजी शेटे, माजी अपर जिल्हाधिकारी के. बी. गवळी, स्वामी विवेकानंद अकादमीचे आबासाहेब सिरसाठ, वाळूज सोनार संघटनेचे अध्यक्ष शिवानंद थोरकर, राज्य सचिव विलास पवार, उपाध्यक्ष गोपाल राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नीलेश सोनवणे म्हणाले, "शिक्षण हे केवळ नोकरीचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. पालकांनीही मुलांमध्ये चांगले संस्कार आणि सकारात्मक विचार रुजविणे आवश्यक आहे."

सोहळ्यात दहावी, बारावी तसेच विविध शैक्षणिक क्षेत्रांत विशेष यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा टाळ्यांच्या कडकडाटात सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि अभिमानाचे भाव दिसून येत होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याचबरोबर समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अर्जुन महाराज पांचाळ, विनोद महाराज जाधव, सौ. विद्याताई रणमले, पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर, आबासाहेब सिरसाठ, वैभव सालपे, गणेश माहूरकर, सौ. सुरेखा दुधडेकर, ज्ञानदेव डोरले आणि दादुलाल बोरकर यांना 'समाजभूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले. समाजाच्या उन्नतीसाठी आणि सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन संघटनेचे कार्याध्यक्ष अरुण भालेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परमेश्वर पांचाळ, सोमनाथ राऊत, बालाजी पांचाळ, कल्याण घुसळकर, गोपाल महामुनी, व्यंकट पांचाळ, दामोदर पांचाळ, संतोष भांडेकर, अमोल डोळस, शिवाजी पांचाळ, चंदू हिवाळे, अविनाश पांचाळ, ज्ञानेश्वर पांचाळ, भगवान राऊत, चंदन शर्मा, नारायण पांचाळ यांच्यासह संघटनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, शैक्षणिक स्पर्धेची प्रेरणा निर्माण करणे आणि समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. समाजबांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण सोहळा प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### परभणीत एटीएसच्या १५ ठिकाणी धाडी; शहरात वाढविला पोलीस बंदोबस्त

**परभणी,/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघाच्या निवडणूकीत महायुतीचे सईद खान विजयी : खान यांना २४२ मते

परभणी,दि.२२(प्रतिनिधी) : परभणी हिंगोली स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणूकीत महायुतीचे उमेदवार सईद खान यांनी ४६५ पैकी पहिल्या पसंती क्रमांकाचे सर्वाधिक २४२ मते मिळवून विजय पटकाविला.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार २२ जून रोजी सकाळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण व निरीक्षक रुचेश जयवंशी यांच्या उपस्थितीत सकाळी मतमोजणीस प्रारंभ झाला. त्यावेळी निवडणूक रिंगणातील प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या पहिल्या पसंती क्रमांकाची मते मोजण्यात आली. त्यात एकूण ४६५ मतापैकी पहिल्या पसंती क्रमांकाचे सर्वाधिक म्हणजे २४२ मते महायुतीचे उमेदवार खान यांनी पटकावले त्या पाठोपाठ महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. विवेक नावंदर यांना १५९ म्हणजे दुसऱ्या क्रमांकाचे तर अपक्ष उमेदवार सुशिलभैय्या देशमुख यांना ५६ मते मिळाली. ते तीसऱ्या क्रमांकावर राहिले. एकूण मतदानात ८ मते बाद झाली.

### केअरवेल हॉस्पिटलद्वारे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीरात १७४ रुग्णांची तपासणी : रक्तदान शिबिरात ५२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**परभणी,/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय योग दिन तसेच केअरवेल हॉस्पिटलच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आरोग्य तपासणी शिबीरात १७४ रुग्णांची तपासणी तर रक्तदान शिबीरात ५२ जणांनी रक्तदान केले.

या उपक्रमाचे आयोजन डॉ. अभिजित इंपर, डॉ. कैलास लीपणे (एमबीबीएस, ऑर्थो) आणि डॉ. विधिता चोरमळे (बीएचएमएस) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिरात एकूण १७४ रुग्णांची मोफत बाह्यरुग्ण विभागामार्फत (ओपीडी) तपासणी करण्यात आली. तसेच ४९ नागरिकांच्या विविध रक्त तपासण्या करण्यात आल्या. शिबिरादरम्यान आयोजित रक्तदान उपक्रमात ५२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. संकलित रक्त हुजूर साहेब ब्लड बँक, परभणी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह तपासणीसह विविध आजारांबाबत तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व उपचारविषयक सल्ला देण्यात आला. आरोग्याबाबत जागरूकता दाखवत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी हुजूर साहेब ब्लड बँक, नांदेडचे शंकरजी मोरे, प्रदीप बायबसे, योगेश गायकवाड पॅथॉलॉजी लॅब, शिवम वळसे, डॉ. विशाल राठोड, नर्सिंग स्टाफ, ऐश्वर्या, नेहा शेळके, श्रद्धा बुध्ये यांच्यासह सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

केअरवेल हॉस्पिटलच्या वतीने रक्तदाते, रुग्ण, मान्यवर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारीवर्ग तसेच हुजूर साहेब ब्लड बँक, परभणी यांचे आभार मानण्यात आले. भविष्यातही अशाच सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### श्रुतपंचमीच्या शुभमुहूर्तावर जैन गुरुकुलाचा शुभारंभ

**परभणी,/प्रतिनिधी :** श्री १००८ नेमिनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र संचलित गुरुकुलाचा शुभारंभ शुक्रवार १९ जून रोजी श्रुतपंचमी या जैन धर्मातील पवित्र पर्वाच्या शुभमुहूर्तावर संपन्न झाला. परमपूज्य १०८ आचार्य पवित्रसागरजी महाराज तथा परमपूज्य १०८ प्रशांतसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी अष्टम प्रतिमाधारी व्रती ॲड. अनिल घेवारे व पद्मकुमार लिंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रुतस्कंध विधान पूजेचे आयोजन करण्यात आले होते. गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी जैन धर्मातील पवित्र ग्रंथ 'षटखंडागम'ची भव्य मिरवणूक काढून कार्यक्रमाची शोभा वाढविली. पूजन विधीनंतर उपस्थित व्रती, विश्वस्त, शिक्षक, पालक व मान्यवरांच्या उपस्थितीत फीत कापून गुरुकुलाचे उद्घाटन करण्यात आले. क्षेत्राचे अध्यक्ष धरमचंदजी गंगवाल व सचिव कमलाकरजी संघई यांनी गुरुकुलात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन समारंभास विश्वस्त मुकेश जैन, सुभाष अंबुरे, गुरुकुल संचालक डॉ. दीपक महिंद्रकर, विलास वानरे, मुख्याध्यापक देवानंद अंबुरे, शिक्षकवृंद तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्षेत्राचे सर्व विश्वस्त, क्षेत्र व्यवस्थापक संदीप हेलसकर, शिक्षकवृंद तसेच ज्ञानेश्वर उदगीरकर, प्रकाश सासकर, रवी कदम आदींनी विशेष परिश्रम घेतले.

गुरुकुलातून आदर्श नागरिक घडतील...

कार्यक्रमात प्रास्ताविक करताना प्रशालेचे मुख्याध्यापक देवानंद अंबुरे यांनी गुरुकुल ही विद्यार्थ्यांना निशुल्क शिक्षण उपलब्ध करून देणारी दर्जेदार संस्था असल्याचे सांगितले. समाजातील अनेक दानशूर व्यक्ती आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पालकत्व स्वीकारण्यास पुढे येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# निवडणूकीतील विजय उपमुख्यमंत्र्यांना समर्पित : खान

## विधान परिषद निवडणूकीत खान यांची बाजी तर अपक्ष उमेदवार देशमुख यांनीही खाली ५६ मते

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** आपल्यासारख्या गरीब व अल्पसंख्यांक कुटूंबातील व्यक्तीस विधानपरिषदेवर पाठविल्याबद्दल परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघातील नवनिर्वाचित सदस्य सईद खान यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे या दोघांचे आभार व्यक्त करतेवेळी या निवडणूकीतील आपला हा विजय त्या दोघांना समर्पित केला.

परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघातून पहिल्या पसंती क्रमांकाचे ४६५ पैकी २४२ मते पटकावून महायुतीचे उमेदवार सईद खान हे विजयी झाले. या विजयाबद्दल माध्यमांच्या प्रतिनिधींशी प्रतिक्रिया व्यक्त करतेवेळी सईद खान यांनी आपल्यासारख्या अत्यंत



गरीब व अल्पसंख्यांक कुटूंबातील सदस्यास राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे व खासदार शिंदे यांनी विधानपरिषदेवर प्रतिनिधीत्व दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. त्या दोघांच्या आपण आयुष्यभर ऋणात राहु, असे मत व्यक्त करतेवेळी शिंदे कुटूंबियांनी आपल्यावर टाकलेल्या या विश्वासास सार्थ राहु, असेही म्हटले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा वारसा चालविणाऱ्या शिंदे कुटूंबियांनी आपल्या निवडीच्या रुपाने हे दाखवून दिले आहे, असे ते म्हणाले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सूनेत्रा पवार, परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्यासह माजी आमदार डॉ. मधुसुदन केंद्रे व अन्य लोकप्रतिनिधींचे आपण आभारी आहोत. विशेषतः खासदार संजय जाधव यांचे ऋणी आहोत. या जिल्ह्यातील या नेतृत्वासह मतदारांनी आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थी लावू, असे ते म्हणाले.






**परभणी- पालकमंत्री मा.ना.सौ. मेघनाताई साकोरे-बोर्डीकर व भाजपा नेते मा. आ. रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणीच्या निवडणुकीसाठी ''इतर शेती संस्था मतदार संघ'' या गटातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.**
**यावेळी भाजपा परभणी महानगरचे गटनेते श्री. मुकुंद खिल्लारे, श्री. भालचंद्र गोरे, श्री. प्रवीण गायकवाड, श्री. दिलीप गिराम, श्री. नामदेव चव्हाण, श्री. माणिक शिंदे, श्री. रमेश शिंदे, श्री. अनंत वैरागर, श्री. हेमंत घन, श्री. सत्यजीत शेरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते दिसत आहेत.**

## साई जन्मस्थान मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. के. कुलकर्णी यांना सन्मानपूर्वक निरोप

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील श्री साईबाबा जन्मस्थान मंदिर येथे सन २०१७ पासून मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले एन. के. कुलकर्णी यांना साई स्मारक समिती विश्वस्त मंडळाच्या वतीने सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. त्यांच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात मंदिराच्या प्रशासनिक आणि व्यवस्थापकीय कामकाजात महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

शिर्डी संस्थानमध्ये अधीक्षक (सामान्य प्रशासन) पदावरून निवृत्त झाल्यानंतर तत्कालीन अध्यक्ष कै. सिताराम सोमा धानू यांच्या आग्रहास्तव कुलकर्णी यांनी २०१७ मध्ये पाथरी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला होता. साईबाबांच्या कर्मभूमीची सेवा झाली, आता जन्मभूमीची सेवा करायची आहे, या भावनेतून त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली होती. शिर्डी संस्थानमधील प्रदीर्घ अनुभवाचा लाभ पाथरी येथील साई जन्मस्थान मंदिराला झाला. त्यांच्या कार्यकाळात मंदिरातील प्रशासन, आस्थापना, सेवेकऱ्यांचे कामकाज आणि विविध व्यवस्थापन प्रक्रियांमध्ये शिस्तबद्धता व कार्यक्षमता वाढविण्यात आली. तसेच देशभरातील साईभक्तांशी असलेल्या संपर्काचा उपयोग करून साईबाबांच्या जन्मस्थानाची माहिती व्यापक स्तरावर पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले.

अलीकडेच एन्जिओप्लास्टी आणि डोळ्याची शस्त्रक्रिया झाल्याने वयोमान व प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. समितीने त्यांचा राजीनामा आदरपूर्वक स्वीकारला. मूळ शिर्डीचे रहिवासी असलेल्या कुलकर्णी यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना, वडिलांकडून पाथरी हेच साईबाबांचे जन्मस्थान असल्याची माहिती मिळाल्याने येथे सेवा करण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य असल्याचे सांगितले.

निरोप समारंभात त्यांच्या पत्नी सौ. छाया कुलकर्णी व पुत्र साईप्रसाद यांचाही सत्कार करण्यात आला. समितीचे अध्यक्ष सुभाष दळी यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सौ. छाया कुलकर्णी यांनीही शिर्डी संस्थानमधील नैवेद्य व्यवस्थापनाचा अनुभव पाथरी येथे मंदिर अधीक्षक म्हणून प्रभावीपणे वापरल्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला. या प्रसंगी व्यवस्थापकीय विश्वस्त ॲड. अतुल चौधरी, विश्वस्त सांगडे, कालिदास चौधरी, संजय भुसारी, मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंदराव चौधरी तसेच मंदिरातील सर्व सेवेकरी उपस्थित होते.

## वाघी बोबडे येथे योग स्पर्धेचे बक्षीस वितरण व योग शिबीर संपन्न

**बोरी,/प्रतिनिधी -** बोरी- जिंतूर तालुक्यातील वाघी बोबडे येथील आयुष्मान आरोग्य मंदिर (आयुष) येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त घेण्यात आलेल्या शालेय योग स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले तसेच सामुदायिक योग शिबिर रविवार दिनांक २१ जून २०२६ रोजी जिल्हा आयुष अधिकारी डॉ. गजानन परळीकर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिकारी डॉ.अनंत दहिवाल होते. तर योग शिबिराचे उद्घाटन प्रभूकृपा विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. संतोष साखरे यांच्या हस्ते झाले. प्रभूकृपा विद्यालय व आयुष्मान आरोग्य मंदिर (आयुष) यांच्या संयुक्त विद्यमानाने आणि योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम घेण्यात आला.

योग स्पर्धेत विजयी ठरलेले शायद मिस्किन शेख (प्रथम), नंदिनी शिवराम रोहीनकर (द्वितीय), सय्यद निजबाफिरदोस फारुख (तृतीय) यांना स्कूल बॅग व शालेय साहित्याचे बक्षीस




### योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांनी केले योग मार्गदर्शन

मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. प्रभूकृपा विद्यालयाचे क्रीडाशिक्षक दामोदर सरगर व सुभाष वाळवंटे यांचा योग स्पर्धा व योग शिबिरातील योगदानाबद्दल डॉ.दहिवाल व मुख्याध्यापक प्रा.साखरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी औषध निर्माण अधिकारी श्री. विजयकुमार पोपळाईत, आरोग्य सेविका श्रीमती स्वाती पोहकर, आशा वर्कर श्रीमती मीना कंठाळे, प्रभूकृपा विद्यालयाचे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

बोरी- वाघी बोबडे येथील आयुष्मान आरोग्य मंदिर (आयुष) येथे योग दिनानिमित्त शालेय योग स्पर्धा व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजयी विद्यार्थ्यांसह मान्यवर दिसत आहेत.

वयोवृद्ध नागरिकांना योग मार्गदर्शन वाघी बोबडे येथील आयुष मंदिरात आलेल्या वयोवृद्ध नागरिकांना योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांनी काही विशेष प्राणायाम व सोपी सुलभ योगासने यांची प्रात्यक्षिकासह माहिती दिली.




## नीट-जेईई परीक्षेत ज्ञानसाधना फार्मसी महाविद्यालयाचे यश

**परभणी,/प्रतिनिधी:** तालुक्यातील ज्ञानसाधना कॉलेज ऑफ फार्मसीचा विद्यार्थी कुमार विवेक मोतीराम कदम याने नीट-जेईई २०२६ (NIPER JOINT ENTRANCE EXAMINATION) या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. तो या परीक्षेत ऑल इंडिया रँक मध्ये ३५९३ वा ठरला आहे.

या विद्यार्थ्याच्या यशाबद्दल ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के सर संस्थेच्या सचिव प्रा. सौ शितल सोनटक्के मॅडम यांनी विशेष अभिनंदन करून शुभेच्या दिल्या आहेत.तसेच फार्मसी महाविद्यालयाचे समन्वयक श्री डी व्ही सुर्यवंशी, प्राचार्य डॉ. एम डी सलाउद्दीन, उपप्राचार्य श्री डॉ. क्षीरसागर एन व्ही, विभाग प्रमुख प्रा. सौ.ए ए नजन , विभाग प्रमुख श्री डॉ. पी एन काळे , ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल शिंनगारे, प्रा. डॉ. राहुल गायकवाड, प्रा. जाधव एस पी, प्रा.मस्के आर ए, प्रा. कुमावत सी ए, प्रा. डॉ.पूजा कडू , प्रा .पडोळे जे आर,श्री पन्नाड एन व्ही , श्री प्रकाश रासे , श्री गिरीश गच्वे , श्री धनराज राजूरे , श्री घोगरे के डी , प्राध्यापक तथा प्राध्यापिकेतर कर्मचारी यांनी विशेष कौतुक करत भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या आहेत.

# दुषित पाणी पुरवठ्याविरोधात पत्रकार संघ आक्रमक; तीन ते चार दिवसांत स्वच्छ पाणी देण्याची प्रशासनाची ग्वाही

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर शहरातील विविध भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या दूषित व गढूळ पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नावर अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघ, जिंतूर यांनी सोमवारी नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने केली.

शहरातील अनेक प्रभागांमध्ये नळाद्वारे येणारे पाणी गढूळ, दुर्गंधीयुक्त असून त्यामध्ये गाळ, माती तसेच सांडपाणी मिसळत असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

पत्रकार संघाच्या निवेदनात शहरातील जलवाहिन्यांची तपासणी, गळतीची ठिकाणे शोधणे, पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवणे, अहवाल सार्वजनिक करणे तसेच दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी अनिल समीद्रे व पाणीपुरवठा शाखेच्या अभियंता मनीषा कोंढेकर यांच्याशी सविस्तर चर्चा केली. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने समस्या गांभीर्याने हाताळण्याचे आश्वासन दिले.

चर्चेदरम्यान उपमुख्याधिकारी अनिल समीद्रे व अभियंता मनीषा कोंढेकर यांनी शहरातील पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी सुरू असून आवश्यक दुरुस्ती व तांत्रिक उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच येत्या तीन ते चार दिवसांत जिंतूर शहराला स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी पत्रकार संघाला दिली.

दरम्यान, नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. दूषित पाण्यामुळे संभाव्य आरोग्यधोके टाळण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. निवेदनावर पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर,जेष्ठ पत्रकार एम ए मजीद,कार्याध्यक्ष सिराज सिद्दीकी, निहाल अहेमद,अहेमद शेख,रामप्रसाद कंठाळे, मनोज टाक, रियाज चाउस यांच्यासह पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत




''स्वच्छ पाणी हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून त्यात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. प्रशासनाने दिलेल्या मुदतीत प्रश्न निकाली न काढल्यास पुढील तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे,'' असे अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्याकडून सांगण्यात आले.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# भारताचे 'काटेरी' शेजारी

देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सरकारला जनतेने सत्तेवरून हाकलून लावल्यानंतर पूर्वोत्तर भारतातील परिस्थितीत झपाट्याने बदल होतो आहे. म्यानमारमधील रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांचे द्वार असलेल्या पश्चिम बंगालच्या सीमा संरक्षणाच्या दृष्टीने बंदिस्त करण्यात येत असल्याने आपला शेजारी बांगलादेशच्या पोटात दुखू लागले आहे. बांगलादेशात सध्या सत्तेवर भारतविरोधी धोरण असलेल्या पक्षाचे सरकार आहे. परिणामी भारताच्या शत्रूला हाताशी धरून कुरापती करण्याचा डाव बांगलादेशने आखला आहे. या देशाचे पंतप्रधान तारिक रहमान सोमवारी चीनच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात दोन्ही देश १२-१३ करारांवर स्वाक्षरी करणार आहेत. यामध्ये महत्त्वाचा मुद्दा असेल तो तिस्ता नदी जलवाटपाचा. गेल्या अनेक वर्षांपासून हा मुद्दा कायम आहे. शेजारी देशांमध्ये वाद असणे नवीन नाही. पाकिस्तान, चीन, नेपाळ, म्यानमार, बांगलादेश आणि श्रीलंका हे देश सातत्याने भारताच्या विरोधात कुरापती काढत असतात. मोठा भाऊ या नात्याने भारताने कधीही शेजारी देशांसोबत वाद निर्माण होतील, असे पाऊल उचलले नाही. पण, भारताच्या आतापर्यंतच्या शांततापूर्ण, सहिष्णु धोरणाचा फायदा हे शेजारी सतत उचलत आले आहेत. शेख हसीना वाजेद यांना २०२४ मध्ये एका सुनियोजित कटाच्या माध्यमातून सत्तेवरून खाली खेचण्यात आले. भारताचा हस्तक्षेप म्हणा की दबाव म्हणा वा आणखी काही, शेख हसीना कुटुंबासहित सुखरूप आहेत. अन्यथा, त्यांचे वडील शेख मुजीबुर रहमान यांची त्यांच्या कुटुंबीयांसह ज्या प्रकारे हत्या करण्यात आली होती, तसाच प्रकार शेख हसीना यांच्याबाबतीत घडणे अशक्य नव्हते. बांगलादेशचा जन्म भारतामुळे झाला आहे. तरीही बांगलादेशच्या भारतविरोधी म्होरक्यांना भारताच्या उपकाराचे भान राहत नाही. आता पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर तारिक यांनी आपल्या पहिल्या विदेश दौऱ्यासाठी मलेशिया या मुस्लिम देशाची निवड केली. हा दौरा आटोपल्यानंतर ते चीनला जात आहेत. वास्तविक पाहता बांगलादेशला सर्वात जास्त सहकार्य आणि मदत भारताने केली आहे. चीन आणि मलेशिया हे तसे भौगोलिक अंतराचा विचार केल्यास दूरचे देश. तरीही सुरुवातीच्या दौऱ्यांसाठी मलेशियाची निवड हे मुस्लिम देश, या नात्याने केली असावी तर चीन भेट ही भारतावर दबाव टाकण्यासाठी केली असावी अशी शंका घेण्यास वाव आहे. बांगलादेशवर किंवा अन्य कोणत्याही शेजाऱ्याच्या राष्ट्रावर नैसर्गिक संकट आले की सर्वप्रथम भारतच मदतीला धावून जातो, हा इतिहास आहे. पण, शेजारी देशांना याचा विसर पडतो. पहिल्या अधिकृत दौऱ्यासाठी मलेशियाची निवड करणे, हा रहमान यांचा नाईलाज असेलही. पण, त्यातून चांगला संदेश जात नाही. मलेशियात लाखोंच्या संख्येने बांगलादेशी कामासाठी जातात. कधी काळी भारत हा त्यांच्यासाठी हक्काचा देश होता. सीमा ओलांडून विनासायास ते भारतात येऊ शकत होते. पण, आता परिस्थिती बदलली आहे. युरोपियन देशांनीही आता मुस्लिम देशांतील नागरिकांना प्रवेश देण्यासाठीचे नियम कठोर करण्यास प्रारंभ केला आहे. मध्यंतरीच्या काळात बांगलादेशचे अर्थकारण सुधारत होते. ते आता एकदम माघारले आहे. अंतर्गत परिस्थिती नाजूक आणि अस्थिर असल्याने बांगलादेशात पाश्चात्त्य देश गुंतवणूक करण्यास इच्छुक नाहीत. बांगलादेशच्या परकीय गंगाजळीत डॉलर्स ओतण्याचे काम परदेशात काम करणारे बांगलादेशी कामगार करीत असतात. आज पूर्वोत्तर आशियाई देशांमध्ये तेथील लक्षावधी कामगार काम करीत आहेत. सर्वाधिक आठ लाख कामगार मलेशियात आहेत. कामगारांच्या मुद्द्यावरून दोन्ही देशांच्या संबंधात सध्या तणाव आहे. मलेशियातील नोकर भरती प्रक्रियेत गैरप्रकार करून बांगलादेशी कामगार नोकरी मिळवितात, असा मलेशियाचा आरोप आहे. याच मुद्द्यावरून मलेशियाने जून २०२४ पासून बांगलादेशी स्थलांतरित कामगारांवर बंदी घातली आहे. ही बंदी उठवावी आणि कामगारांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि मलेशियन कंपन्यांनी बांगलादेशात गुंतवणूक करावी, या उद्देशाने रहमान यांनी सुरुवातीला मलेशियाला प्राधान्य दिले, असे म्हणता येईल. तारिक रहमान गेल्या जानेवारी महिन्यात पंतप्रधान झाल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना भारतभेटीचे निमंत्रण दिले होते. त्यानंतर चीननेही त्यांना बीजिंग दौऱ्याचे निमंत्रण पाठवले. रहमान यांनी पहिल्या विदेश दौऱ्यासाठी भारत-चीनऐवजी मलेशियाची निवड केली. भारतासोबतचे संबंध बिघडल्यानंतर बांगलादेशाचे उद्योग संकटात सापडले. शेख हसीना वाजेद यांचे सरकार गेल्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वातील हंगामी सरकारने भारताला बाजूला ठेवून चीनसोबत जवळीक वाढविली. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चीनने प्रचंड पैसा ओतला आहे. अर्थात हा सारा पैसा कर्जाच्या रूपाने दिला गेला आहे. या सर्व घडामोडींकडे भारत बारीक नजर ठेवून आहे. शेजारी देशांनी चीनसोबत कितीही जवळीक साधली तरी आर्थिक आणि भू-राजकीयदृष्ट्या याचे काहीच परिणाम होणार नाही, अशा मजबूत स्थितीत आज भारत आहे.

कोरोनानंतरची आर्थिक परिस्थिती, युक्रेन-रशिया युद्ध, वर्तमानातील अमेरिका-इराण संघर्ष, या सर्व जागतिक संकट काळातील परिस्थिती ज्या कौशल्याने हाताळली, ते पाहता शेजारी देशांमध्ये घडत असलेल्या कोणत्याही घटनांचा भारतावर फार परिणाम होणार नाही. तरीही शेजारी कुरापत करीत असेल तर लक्ष ठेवावे लागतेच. तारिक यांच्या भेटीत चीनसोबत १३ करार होणार आहेत, अशी माहिती बांगलादेशचे परराष्ट्र सचिव असीम आलम सियाम यांनी दिली आहे. चीनसोबत तिस्ता प्रकल्पावरही चर्चा होणार असल्याचे सियाम म्हणाले. समजून घ्यायचे ते हे की, तिस्ता नदीचा प्रश्न भारत, बांगलादेश आणि चीन या तिन्ही देशांच्या भू-राजकीय हितसंबंधांशी जोडलेला आहे. भारताच्या ईशान्येकडील राज्यांसाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या या परिसरात चीनचा वाढता हस्तक्षेप भविष्यात चिंतेचा विषय ठरू शकतो. चीनची नीती ही कधीच केवळ व्यापार आणि गुंतवणुकीपुरती मर्यादित नसते. तो आर्थिक मदतीच्या माध्यमातून संबंधित देशांच्या धोरणांवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, हे श्रीलंकेतील हंबनटोटा बंदराच्या अनुभवातून जगाने पाहिले आहे. नेपाळ, मालदीव आणि पाकिस्तानमध्येही चीनने अशाच प्रकारे आपले आर्थिक आणि सामरिक हितसंबंध विस्तारले आहेत. कोणताही देश आपल्या राष्ट्रीय हितासाठी परराष्ट्र धोरण आखतो, हे स्वाभाविक आहे. परंतु भारताशी शत्रुत्व निर्माण करून चीनच्या छत्रछायेखाली जाणे, हा कोणत्याही दक्षिण आशियाई देशासाठी दीर्घकालीन लाभाचा व्यवहार ठरलेला नाही. पाकिस्तानचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. चीनकडून अब्जावधी डॉलर्सची मदत मिळूनही पाकिस्तानची अर्थव्यवस्था आज गंभीर संकटात सापडलेली आहे. कर्जाचा डोंगर वाढला असून आर्थिक स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत. दक्षिण आशियातील स्थैर्य आणि शांततेसाठी बांगलादेशने वास्तवाचे भान ठेवणे आवश्यक आहे. १९७१ च्या इतिहासाची आठवण करून देण्याची वेळ भारतावर येऊ नये. पण, सध्या तरी बांगलादेशात तिरकी चाल आवडू लागली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांत भारताने पाकिस्तानच्या वैरभावाचा, चीनच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षांचा, नेपाळच्या राजकीय अस्थिरतेचा, श्रीलंकेच्या बदलत्या भूमिकेचा आणि आता बांगलादेशातील वाढत्या भारतविरोधी प्रवाहांचा सामना केला आहे. भारताच्या वाट्याला सतत काटेरी शेजारीच आले. पण, त्यात भारताचे काही बिघडले नाही, उलट ज्यांनी काटे पेरले, त्यांचेच बिघडले, एवढे तरी बांगलादेशने लक्षात ठेवावे. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# बेगानी शादी में पाकिस्तान दिवाना!

बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना! उर्दूतील ही एक म्हण आहे. याचा अर्थ म्हणजे दोघांच्या लग्नात तिसराच हर्षभरित! पाकिस्तानचे सध्या तसे झाले आहे. युद्धबंदी करार झाला आहे अमेरिका व इराण यांच्यात. दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत आणि जल्लोष सुरू आहे पाकिस्तानात!

एक दहशतवादी देश असूनही पाकिस्तानला अमेरिका, इस्त्रायल, इराण, लेबनान यांच्यातील युद्ध संपविण्याचे श्रेय दिले जात आहे. ओसामा बिन लादेनला आश्रय देणारा पाकिस्तान साऱ्या जगात अचानक शांतिदूत बनला आहे. विशेष म्हणजे ओसामाने ज्या अमेरिकेवर हल्ला चढविला व नंतर पाकिस्तानात आश्रय घेतला, आता तीच अमेरिका, त्याच पाकिस्तानचा उदोउदो करण्यात धन्यता मानत आहे.

**इस्लामाबाद करार :** अमेरिका-इराण यांच्यातील १४ कलमी करारावर स्वित्झर्लंण्ड या तटस्थ देशात सह्य करण्यात आल्या. तरी हा करार इस्लामाबाद करार म्हणून ओळखला जाणार आहे. पाकिस्तानचे फिल्ड मार्शल असिम मुनीर यांनी पाकिस्तानसाठी ही कामगिरी बजावली आहे. इराणी लष्करातील बड्या अधिकाऱ्यांशी मुनीर यांचे व्यक्तिगत संबंध आहेत. त्याचा वापर करून मुनीर यांनी अमेरिका-इराण यांना या समझोत्यासाठी तयार केले असे समजते. यासाठी मुनीर अनेकदा गोपनीयपणे तेहरानला गेले असेही समजते. या समझोत्याचे काही भाग अद्याप बाकी असले तरी पाकिस्तानने याचे श्रेय घेणे सुरू केले आहे. अरब लीग, ओआयसी म्हणजे ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कंट्रिज यांना जे जमले नाही ते पाकिस्तानने करून दाखविले असा प्रचार पाकिस्तानी माध्यमांनी सुरू केला आहे. ४७ वर्षांपासून अमेरिका-इराण यांच्यात साधी चर्चाही होत नव्हती. पाकिस्तानने ती घडवून आणली व मध्यपूर्वेत शांतता युग सुरू केले असा या प्रचाराचा एकूण रोख आहे.

**होर्मुझ उघडणार :** इराण व ओमान यांच्या मधोमध असणारी होर्मुझ सामुद्रधुनी लवकरच उघडली जाणार आहे. जगाचा २० टक्के तेल व्यापार या सामुद्रधुनीतून केला जातो. होर्मुझची दुहेरी नाकेबंदी झाली होती. प्रथम इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि नंतर अमेरिकेनेही तसाच निर्णय घेतला. अमेरिकेने आपल्या लष्करी शक्तीच्या बळावर ही सामुद्रधुनी बंद केली तर इराणने त्याला लाभलेल्या भौगोलिक अनुकूलतेचा फायदा उठवीत होर्मुझ बंद केली. युद्धबंदीच्या कोणत्याही करारानंतर ही सामुद्रधुनी उघडली जाणे अपेक्षितच होते. त्यामुळे सामुद्रधुनी उघडली जाणे याला कराराचा फार महत्त्वाचा भाग मानला जात नाही. मात्र यासाठी इराण काही शुल्क आकारणार काय हे करारात स्पष्ट करण्यात आलेले नाही. याबाबत परस्परविरोधी बाबी सांगितल्या जात आहेत.

**मुनीर फॅक्टर :** इराणचा आण्विक कार्यक्रम, त्याच्याजवळ असलेले ४६० किलो शुद्ध युरेनियम व भविष्यकाळात इराणने एका मर्यादेबाहेर जाऊन युरेनियम शुद्ध न करणे आणि त्याबदल्यात अमेरिकेने इराणची गोठवलेली संपत्ती मोकळी करणे हा या कराराचा महत्त्वाचा भाग असून, त्यावर ६० दिवसात अंतिम करार केला जाणार आहे. हा या कराराचा खरा गुंतागुंतीचा भाग राहणार आहे. आणि तो लागू करणे एक अवघड भाग राहणार आहे. कारण, दोन्ही देशांमध्ये असलेले अविश्वासाचे संबंध. मात्र, या दोन देशांना जोडणारी समान कडी म्हणजे फिल्ड मार्शल मुनीर. अमेरिका व इराण दोघांनाही पुन्हा एक युद्ध परवडणारे नसल्याने मुनीर यांच्या मध्यस्थीने हा प्रश्न सोडविला जाईल असे मानले जाते. यासाठी मुनीर फार परिश्रम करीत असल्याचे वृत्त पाकिस्तानी माध्यमांनी दिले आहे. भारत-पाकिस्तान यांच्यात मागील वर्षी झालेल्या युद्धापासून मुनीर यांची प्रतिमा पाकिस्तानात, अमेरिकेत आणि मुस्लिम जगतात उंचावली आहे. पाकिस्तानी माध्यमांचा प्रचार हे त्याचे कारण असू शकते.

**युरेनियम, युरेनियम! :** वर्षभरापूर्वी अमेरिकेने इराणवर हल्ला चढविला होता. तेव्हा व आताही इराणचा आण्विक कार्यक्रम हाच वादाचा खरा मुद्दा होता असे सांगितले जाते. बराक ओबामा राष्ट्रपती असताना त्यांनी हे काम एक गोळीही न झाडता केले होते. पण राष्ट्रपती ट्रम्प यांचे जरा वेगळे उद्दिष्ट होते. व्हेनेझुएला या जगातील सर्वांत मोठा तेलसाठा असलेल्या देशात त्यांनी ज्या सहजतेने सत्ता परिवर्तन घडवून आणले, तसेच त्यांना इराणमध्ये घडवून आणावयाचे होते. त्यासाठी सर्वोच्च नेते खामेनी यांना संपविणे आवश्यक होते. खामेनी संपले की इराणचे नेतृत्व संपले असे राष्ट्रपती ट्रम्प यांना त्यांच्या सल्लागारांनी सांगितले असावे. युद्धाच्या पहिल्या दिवशी म्हणजे २८ फेब्रुवारी रोजी खामेनी यांना ठार करण्यात अमेरिकेला यश मिळाले. मात्र अमेरिकेच्या दुर्दैवाने दुसरे खामेनी बचावले. आणि त्यांनीच सारा खेळ पालटला. दुसरे खामेनी कितपत जखमी झाले होते याचा तपशील अद्याप बाहेर आला नसला तरी ते फार जखमी झाले नसावेत असे आता मानले जात आहे. या खामेनीला चीन व रशिया यांनी पूर्ण ताकद दिली. आणि त्याआधारे इराणने अमेरिका व इस्त्रायल यांचा मुकाबला केला.

**नजर तेलावर :** राष्ट्रपती ट्रम्प इराणच्या युरेयिनम शुद्धीकरण प्रकल्पाचा दाखला देत असले तरी त्यांची नजर इराणच्या तेलावर होती. त्यासाठी त्यांना तेथे कठपुतली सरकार हवे होते, जे त्यांना साध्य करता आले नाही. पण, इराणच्या तेलावर चीनने अगोदरच कब्जा केलेला आहे, हे ट्रम्प ओळखू शकले नाहीत. आता त्यांना इराणच्या आण्विक कार्यक्रमाला वेसण घातल्याचे श्रेय घेत या साऱ्या प्रकरणाला पूर्णविराम द्यावयाचा आहे असे दिसते.

**ओबामा आणि ट्रम्प :** बराक ओबामा राष्ट्रपती असताना, अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पकडून ठार केले व नंतर समुद्रात त्याचे विसर्जन केले. पण, हा निर्णय घेण्यापूर्वी ओबामा यांनी कमालीची काळजी घेतली होती. अबोटाबादच्या हवेलीत वावरणारी व्यक्ती ओसामा बिन लादेन हीच आहे, याची वारंवार खात्री करून घेतल्यानंतर त्यांनी त्या कारवाईला हिरवी झेंडी दाखविली होती. आणि याठिकाणी ट्रम्प यांनी कोणतेही 'होमवर्क' न करता एका युद्धाचा निर्णय घेऊन टाकला. जी चूक राष्ट्रपती पुतिन यांनी केली, तीच राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणबाबत केली आहे. युक्रेनला चार दिवसांत शरणागतीसाठी भाग पडू असे पुतिन यांना वाटत होते, तर अमेरिकेच्या ताकदीपुढे इराणचा काय निभाव लागणार असे ट्रम्प यांना वाटत होते. पण इराण युद्ध अंगलट येऊ लागल्यावर त्यांनी तेहरानसोबत तह करण्याचा निर्णय घेतला.

**आता पाकिस्तान ? :** राष्ट्रपती ट्रम्प यांची नजर आता पाकिस्तानकडे जाण्याची शक्यता आहे. पाकिस्तानवर आपली पकड मजबूत करण्यासाठी ते फिल्ड मार्शल मुनीर यांना पाकिस्तानच्या सिंहासनावर बसवतील काय? पाकिस्तानातील शाहबाज शरीफ सरकार तसेही नामधारी आहे. सारी सूत्रे मुनीर यांच्या हाती गेली आहेत. आता मुनीर यांनाही राष्ट्रपती होण्याची स्वप्ने पडू लागली आहेत. सारी सूत्रे आपल्या हाती आहेच, मग आता दुय्यम भूमिका कशाला? सत्तेची नशा फार वाईट असते.

अमेरिकेचे एक राष्ट्रपती ट्रूमन यांनी आपल्या एका भाषणात म्हटले होते, सत्ताधीशांच्या पतनाची तीन कारणे असतात- सत्तेचा हव्यास, पैशाची लालसा आणि महिला.

राष्ट्रपती ट्रूमन पुढे म्हणतात, ''माझ्या आयुष्यात एकच महिला आहे आणि सध्या ती माझ्या घरी माझी वाट पाहात आहे, म्हणजे माझी पत्नी.'' फिल्ड मार्शल मुनीर सर्वगुणसंपन्न आहेत. त्यामुळे अमेरिका-इराण यांच्यात घडवून आणलेल्या कराराची नशा त्यांना लवकर चढेल असे मानले जाते. ■

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# मुलींची चूक नाहीच का?

मागील वर्षीच्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात मागील वर्षभरात महाराष्ट्रात किती महिला आणि मुली बेपत्ता झाल्या, याची आकडेवारी सांगितली. ही आकडेवारी आहे, ३७ हजार ६९५! ही आकडेवारी केवळ एका राज्याची आहे. सर्व राज्यांची आकडेवारी पाहायला जायचे, तर डोळे पांढरे होतील, इतकी भयावह स्थिती आहे. ही आकडेवारी केवळ महिला आणि मुली बेपत्ता झाल्याची आहे. वर्षभरात किती मुलींवर अत्याचार झाले? किती मुलींना छेडखानीला सामोरे जावे लागले? किती मुलींनी अत्याचारामुळे आत्महत्या केल्या किंवा त्यांच्या हत्या झाल्या? या प्रश्नांची उत्तरे जर आपण मिळवायला लागलो, तर आपल्याला निश्चितच निराशा येईल. त्यामुळेच कदाचित आज आपण वृत्तपत्रांत छापून येणाऱ्या अशा प्रकारच्या बातम्या पाहून न पाहिल्यासारखे करत असू किंवा 'हे नित्याचेच', असे म्हणून वर्तमानपत्र बाजूला ठेवत असू; पण कधीतरी स्वतःच्या मुलींविषयी असे काही झाले तर..? हा प्रश्न आपल्याला निश्चितपणे अस्वस्थ करतो. हा प्रश्न जर आपल्याला अस्वस्थ करत असेल, तर आपण संवेदनशील पालक आहात आणि त्यामुळेच केवळ विचार न करता या समस्येवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आपण पालकांनी निश्चितच विचार करायला हवा.

सध्या लव्ह जिहादचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. आधी फूस लावायची, नंतर प्रेमाच्या जाळ्यात ओढल्यावर धर्मांतर करायला लावायचे, असे प्रकार घडताहेत. कोणत्या समुदायातील लोक कोणत्या मानसिकतेतून हे सर्व करताहेत, हा मुद्दा सर्वांनाच माहिती आहे. पण, यात एका विषयाकडे समाज सोईस्कररीत्या दुर्लक्ष करतोय आणि तो म्हणजे मुलींचे वहावत जाणे. एका विशिष्ट वयापर्यंत मुलींना जपावे लागते, असे आपण पूर्वापार ऐकत आलोय. इथे पालक आणि शिक्षक यांची भूमिका महत्त्वाची ठरते. पण, आता हातातील मोबाईलमुळे मुला-मुलींच्या आकलनाच्या कक्षा प्रचंड विस्तारल्या आहेत. सर्व विषयातील सर्वच ज्ञान ते मोबाईलच्या माध्यमातून मिळवतात. समाज माध्यमांवर अगदी अनोळखी लोकही एकमेकांना फॉलो करतात. तरुण मुलं-मुली प्रोफाईलवर स्वतःचा आकर्षक फोटो ठेवतात. तो फोटो पाहून मैत्रीचे प्रस्ताव येतात आणि ते स्वीकारले जातात. माझे इतके मित्र आहेत, माझे इतके फॉलोअर्स आहेत, हा या वर्गामध्ये प्रतिष्ठेचा विषय असतो. मात्र, आपण ज्यांच्याशी मैत्री करतोय तो मुलगा किंवा मुलगी खरंच मैत्री करण्यास योग्य आहेत का, याचा विचार केला जात नाही. आपण फक्त मुलींच्या बाबतीत हा विचार केला तर १६ ते १८ या वयोगटातील मुली अगदी चांगले नाव, स्टायलिश फोटो पाहूनच हुरळून जातात. मग त्या स्वतःचेही आकर्षक फोटो टाकायला लागतात. मैत्रीला सुरुवात होते. काही जण तर इतके 'क्रेझी' असतात की एकमेकांविषयीच्या अपडेट्स तासा-तासाने देत असतात. या मैत्रीतून मग कधी अधिकार गाजवणे सुरू होईल, हे तिला कळतच नाही. तू हा ड्रेस घालत जा, हा नको घालू, तू अमक्याशी नको बोलू, घरच्यांचे अमुक म्हणणे मनावर नको घेऊ, इथवर सूचना केल्या जातात. गोडीगुलाबीने सुरू होऊन ही मैत्री कोणत्या दिशेने जाणार असते, याची पुसटशी जाणीवही त्या मुलीला तेव्हा येत नाही. जेव्हा जाणीव होते तेव्हा कदाचित उशीर झालेला असतो. नंतर तुम्ही पोलिसात जा किंवा जीवाचे बरेवाईट करा, परिणाम घडून गेलेला असतो. म्हणून सर्वांत महत्त्वाचा मुद्दा कौटुंबिक संवादावरच येऊन थांबतो. कुटुंबात पालक आणि मुले यांच्यात सुसंवाद हवा. मुलीने किंवा मुलाने पालकांना स्वतःहून रोजचे अनुभव सांगणे, ही प्रक्रिया स्वाभाविकपणे घडली पाहिजे. असे झाले तरच मोठे अनर्थ वेळीच टाळले जाऊ शकतात. मुलींनी याबाबतीत सर्वाधिक काळजी घेणे गरजेचे आहे. कारण जी गोष्ट वहावत जाते, ती पुढे जाऊन बुडणार, हे नक्कीच असते. तंत्रज्ञानाचा, संवाद माध्यमांचा वापर जरूर करावा. पण, सोबत आपली विवेकबुद्धी जागृत असू द्यावी. ऑनलाईन किंवा ऑफलाईन कोणाशीही फारसा परिचय नसताना मैत्री करण्याच्या भानगडीत पडूच नये. कोणीतरी तुमच्याशी खोट्या नावाने मैत्री करत असेल तर तुम्ही ते बरेचदा ओळखू शकत नाही. म्हणून समाज असो किंवा समाज माध्यम असो, कमळासारखे राहावे. जेणेकरून आजूबाजूला कितीही चिखल असला तरी फुलाला त्याचा स्पर्श होत नाही. 'मुलगी शिकली, प्रगती झाली', असे म्हणण्याच्या पुढे जात 'मुलगी जागरूक झाली, सुरक्षित राहिली' असे म्हटले पाहिजे. ■

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश

दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जातो. भारताच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रसंघाने २०१४ मध्ये हा दिवस अधिकृतपणे मान्यता देऊन संपूर्ण जगाला योगाचे महत्त्व पटवून दिले. आज जगातील शेकडो देशांमध्ये लाखो लोक योगाभ्यास करीत आहेत. ही घटना केवळ भारतासाठी अभिमानाची बाब नाही, तर भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि ज्ञानपरंपरेच्या वैश्विक स्वीकाराची साक्ष आहे. मात्र या निमित्ताने एक प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज आहे. ज्या योगविद्येने जगाला आकर्षित केले, ज्या ज्ञानपरंपरेचे महत्त्व जगातील प्रगत राष्ट्रांनी ओळखले, त्या परंपरेविषयी भारतीय समाजाने किती गांभीर्याने विचार केला आहे? योगाचा खरा अर्थ आपण समजून घेतला आहे का? की आपण योगाला केवळ काही शारीरिक व्यायाम आणि आसनांपुरते मर्यादित करून ठेवले आहे?

भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण देणगी म्हणजे मनुष्याचा समग्र विचार. पाश्चात्त्य विचारपद्धती बहुधा शरीर आणि बुद्धीच्या विकासावर भर देताना दिसते, तर भारतीय दर्शनशास्त्र शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा एकात्म विचार करते. मनुष्य हा केवळ मांस आणि हाडांचा बनलेला देह नसून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक स्तर आहेत, अशी भूमिका भारतीय ऋषींनी हजारो वर्षांपूर्वी मांडली. त्यामुळे भारतीय जीवनदृष्टीत आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे नव्हे, तर शरीर, मन आणि बुद्धी यांचे संतुलित आणि सुसंवादी अस्तित्व होय.

योग ही त्याच भारतीय जीवनदृष्टीची फलश्रुती आहे. महर्षी पतंजली यांनी योगसूत्रांमध्ये 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' अशी योगाची व्याख्या केली आहे. म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध किंवा नियंत्रण हेच योग होय. या व्याख्येचा विचार केला तर लक्षात येते की योगाचा संबंध केवळ शरीराशी नसून मनाशी आणि चित्ताशी आहे. मनातील अस्थिरता, तणाव, भीती, लोभ, क्रोध आणि असंख्य विकारांवर नियंत्रण मिळवून अंतर्मनात स्थैर्य निर्माण करणे हा योगाचा मूळ हेतू आहे.

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी योगाचे विविध अर्थ स्पष्ट केले आहेत. 'समत्वं योग उच्यते' असे सांगताना सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी यांमध्ये समत्व राखणे म्हणजे योग असे त्यांनी प्रतिपादन केले. 'योगः कर्मसु कौशलम्' या वचनातून कर्मामध्ये कौशल्य आणि उत्कृष्टता प्राप्त करणे हा योगाचा आणखी एक अर्थ सांगितला आहे. यावरून स्पष्ट होते की योग म्हणजे केवळ आसनांची मालिका नसून जीवन जगण्याची एक परिपूर्ण कला आहे.

दुर्दैवाने अनेक वर्षांच्या परकीय आक्रमणांमुळे आणि इंग्रजी शिक्षणपद्धतीच्या प्रभावामुळे भारतीय समाज आपल्या ज्ञानपरंपरेपासून दूर गेला. राजकीय गुलामगिरीतून भारत मुक्त झाला; परंतु मानसिक गुलामगिरीचे ओझे आजही पूर्णपणे दूर झालेले नाही. स्वातंत्र्यानंतरही आधुनिकता म्हणजे पाश्चात्त्यांचे अंधानुकरण अशी एक चुकीची समजूत समाजात रुजत गेली. आपल्या परंपरा, जीवनशैली, आहारपद्धती, कुटुंबव्यवस्था आणि संस्कार यांच्याकडे मागासलेपणाच्या नजरेने पाहण्याची प्रवृत्ती वाढली.

भारतीय हवामान, भौगोलिक परिस्थिती आणि सांस्कृतिक पृष्ठभूमी लक्षात न घेता विदेशी जीवनशैलीचे अनुकरण सुरू झाले. अशा परिस्थितीत जगाने पुन्हा भारतीय ज्ञानपरंपरेकडे वळण्यास सुरुवात केली. योग, आयुर्वेद, ध्यान, प्राणायाम आणि भारतीय आरोग्यविषयक संकल्पना यांचा अभ्यास जगभरात होऊ लागला. अमेरिकेपासून युरोपपर्यंत आणि ऑस्ट्रेलियापासून आफ्रिकेपर्यंत योगकेंद्रांची संख्या वाढू लागली. तणावमुक्त जीवनासाठी, मानसिक आरोग्यासाठी आणि शारीरिक सुदृढतेसाठी योग हा प्रभावी उपाय असल्याचे संशोधनातून सिद्ध होऊ लागले.

जगातील प्रगत राष्ट्रांनी योगाचा स्वीकार केल्यानंतर भारतीय समाजातही योगाविषयी नव्याने आकर्षण निर्माण झाले. आज देशातील शहरांमध्ये, गावांमध्ये, उद्यानांमध्ये आणि घराघरांत योगाभ्यास केला जातो. ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. मात्र या वाढत्या लोकप्रियतेसोबत योगाचे तात्त्विक स्वरूपही समजून घेणे आवश्यक आहे.

योग म्हणजे फक्त सूर्यनमस्कार किंवा काही आसने नव्हेत. महर्षी पतंजली यांनी अष्टांग योगाची संकल्पना मांडली आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी हे योगाचे आठ टप्पे आहेत. यामध्ये आसन हा केवळ एक घटक आहे. सत्य, अहिंसा, संयम, शुचिता, आत्मपरीक्षण, ध्यान आणि आत्मिक उन्नती यांचा समावेश योगात होतो. त्यामुळे योग ही संपूर्ण जीवनपद्धती आहे. भारतीय परंपरेने नेहमीच ज्ञानाचे स्वागत केले आहे. मात्र आत्मविश्वास गमावून अंधानुकरण करणे आणि स्वतःच्या परंपरेला कमी लेखणे हे योग्य नाही. जगातील सर्वोत्तम गोष्टी स्वीकारताना स्वतःच्या संस्कृतीची मुळे अधिक घट्ट करणे हीच खरी प्रगती आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन हा केवळ योगासनांचे प्रात्यक्षिक करण्याचा दिवस नाही. तो आपल्या संस्कृतीचा, तत्त्वज्ञानाचा आणि जीवनमूल्यांचा पुनर्शोध घेण्याचा दिवस आहे. योगाला केवळ आरोग्याच्या चौकटीत न पाहता जीवनदृष्टी म्हणून स्वीकारण्याची आवश्यकता आहे. आज आवश्यकता आहे ती भारतीय समाजाला, विशेषतः युवकांना, आपल्या ज्ञानपरंपरेचे महत्त्व पटवून देण्याची. या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी केवळ योगासनांचा संकल्प करू नये, तर भारतीय ज्ञानपरंपरेच्या अभ्यासाचा आणि आचरणाचा संकल्प करावा.

भारतीय ज्ञानपरंपरेची ही कस्तुरी आपल्या जवळच आहे. तिचा सुगंध स्वतः अनुभवूया आणि जगालाही अनुभवू देऊया. हाच आंतरराष्ट्रीय योग दिनाचा खरा संदेश ठरेल. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### निर्मल वारी : वारकऱ्यांच्या सेवेतून विठ्ठलसेवा



आषाढ महिना जवळ येऊ लागला की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एक अनामिक हुरहूर आणि चैतन्य दाटून येते. शतकानुशतकांची परंपरा लाभलेली पंढरीची वारी म्हणजे केवळ पायी चालणारा मानवी समूह नव्हे, तर तो भक्ती, प्रेम आणि समतेचा अथांग महासागर आहे. ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या तालावर लाखो पावले जेव्हा पंढरपूरच्या दिशेने पडू लागतात, तेव्हा अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय होऊन जातो. वारी म्हणजे विठ्ठलाची पायी भक्ती, जिथे साक्षात भगवंतही आपल्या लाडक्या भक्तांसोबत दिंडीत चालतो, अशी सर्वसामान्यांची श्रद्धा आहे. याच सेवाभावाचे अत्यंत पवित्र आणि आधुनिक रूप म्हणजे 'निर्मल वारी अभियान' होय.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संतशिरोमणी तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचा आणि 'निर्मल वारी अभियानात' प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव माझ्या आयुष्याला एक नवी दिशा देणारा ठरला. वारीमध्ये सेवा करण्यासाठी जेव्हा आम्ही पुण्यातून माळशिरसच्या दिशेने प्रवासाला सुरुवात केली, तेव्हा वाहनात अनेक नवीन चेहरे होते. वेगवेगळ्या विचारांचे, वयाने आणि व्यवसायाने भिन्न असलेले हे लोक सुरुवातीला एकमेकांसाठी अनोळखी होते. परंतु, जेव्हा एखादा स्वयंसेवक दुसऱ्या स्वयंसेवकाला भेटतो, तेव्हा अवघ्या काही तासांतच त्यांच्यात रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट मैत्री निर्माण होते. आपण सगळे एकाच विठ्ठल परिवाराचे घटक आहोत, ही उदात्त भावना प्रत्येकाच्या मनात जागृत झालेली असते. प्रवासादरम्यान निसर्गरम्य वातावरणात आणि देशभक्तीपर तसेच भक्तिगीतांच्या सुरावलींमध्ये आम्हा स्वयंसेवकांमध्ये एक अभूतपूर्व जोश निर्माण झाला होता. प्रवासाचा एवढा मोठा पल्ला कसा पार पडला, हे कोणाला समजलेच नाही.

या संपूर्ण अभियानातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे समाजाची सामूहिक जबाबदारी. स्वच्छता हा केवळ शासनाचा किंवा एखाद्या अभियानाचा भाग नसून, ती प्रत्येकाची वैयक्तिक आणि सामाजिक कर्तव्याची भावना असायला हवी. लाखो लोक एका ठिकाणी जमूनही जर तो परिसर स्वच्छ राहू शकत असेल, तर ती लोकचळवळीची मोठी शक्ती आहे. 'निर्मल वारी' हे केवळ स्वच्छतेचे आंदोलन नाही, तर तो वारकरी संस्कृतीतील आंतरिक शुद्धतेचा बाह्य आविष्कार आहे.

**वीरेंद्र सोनवणे**/८८८८२४४८८३

■■■

## वाचक पत्रे

### प्राचीन ऋषिमुनींची गणिते आणि सध्याचे हवामान खाते

आपली वेळ न चुकविता बरोबर हजेरी लावण्याचे श्रेय वरुणराजाला द्यावेच लागेल. यावर्षी अधिक ज्येष्ठ महिना आला आणि त्यानुसार निज ज्येष्ठात पाऊस अपेक्षित असणार, पण मृग नक्षत्राची सुरुवात करून तो थबकला आणि निज ज्येष्ठात आर्द्रा नक्षत्रावर तो हजेरी लावणार. त्याची जी सुयोग्य नक्षत्रे आहेत त्यांचा मान वरुणराजा नक्की राखणार. म्हणूनच ऋषिमुनींना त्याच्या गणिताचे श्रेय द्यायलाच हवे. काही अपवाद घडतात जसे १९६६ मध्ये पाण्याचा भयंकर दुष्काळ पडला आणि मुंबई रिकामी करण्याच्या योजना, एवढेच नाही तर त्याची ब्लूप्रिंटसुद्धा तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी तयार केली होती. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना कडक शिक्षा करण्याचा अध्यादेशसुद्धा निघाला होता. वरुण राजाला दोष देण्यापेक्षा निसर्गाचा आदर ठेवणे आपले कर्तव्य आहे. हवामान खाते एकवेळ चुकेल पण ऋषिमुनींची गणिते चुकणार नाहीत.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

■■■

### मूलभूत अधिकार पालन सक्तीचे

''पदपथावरून चालणे हा मूलभूत अधिकार आहे. ये-जा करणाऱ्या वाहनांच्या तुलनेत या अधिकाराला जास्त महत्त्व देणे गरजेचे आहे'' अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी एका खटल्याच्या सुनावणीवेळी केली. पायी चालण्याचा अधिकार हा राज्यघटनेच्या कलम १९ (१)(ड) अंतर्गत प्रवासाचा अधिकार आणि कलम २१ (जीविताचा व स्वातंत्र्याचा अधिकार) यांच्यासह इतर मूलभूत अधिकारांचा हा भाग असल्याचे तसेच पदपथावरून चालण्याच्या अधिकाराचे उल्लंघन होत असेल तर नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार असला पाहिजे व सरकारने यासंदर्भात कायदा करावा असे न्यायालयाने म्हटले आहे. हा आजच्या शहरातील परिस्थितीचा विचार करता अतिशय योग्य निर्णय आहे. शहरातील पदपथांवर टपऱ्यांचे साम्राज्य थाटले आहे हे उद्ध्वस्त करायची व नागरिकांना पदपथ खुला करून देण्याची जबाबदारी महानगरपालिका, नगरपालिका आणि विकास प्राधिकरणाची आहे. लोकसंख्येच्या व वाहनांच्या तुलनेत नगरातील रस्त्यांचे रुंदीकरण करणे हेसुद्धा अत्यंत गरजेचे आहे. ■

**प्रा. डॉ. डी. डी. कुंभार**/पुणे. ९८६०१०८८८२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८७४२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मुळुकवाडीत मध्यरात्री धाडसी चोरी; 3 तोळे सोने अन् 50 हजारांची रोकड लंपास

लिंबागणेश — बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथे मध्यरात्री चोरट्यांनी घर फोडून सुमारे साडेचार लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. या घटनेने गावात खळबळ उडाली आहे. मुळुकवाडी येथील संदिप अंबादास ढास हे गाय आजारी असल्याने रात्री शेतात मुक्कामी होते. दरम्यान मध्यरात्री सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास द्वारकाबाई ढास यांना शेजारील खोलीत आवाज आल्याने जाग आली. त्यांनी घराच्या गच्चीवर झोपलेल्या प्रतिक्षा ढास यांना याची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी फोनवरून शेतात असलेल्या संदिप ढास यांना चोरीची माहिती दिली. संदिप ढास यांनी तातडीने घरी येऊन पाहणी केली असता घरातील दोन्ही कपाटे फोडलेल्या अवस्थेत आढळून आली. कपडे अस्ताव्यस्त पडलेले होते तसेच सोन्याचे दागिने ठेवण्याच्या डब्या उघड्यावर पडलेल्या दिसून आल्या. घरातील ३ तोळे सोने आणि खत खरेदीसाठी ठेवलेली ५० हजार रुपयांची रोकड असा एकूण सुमारे साडेचार लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे त्यांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी मंगेश साळवे व लिंबागणेश पोलीस स्टेशनचे राठोड यांना फोटो व व्हिडिओ पाठवून घटनेची माहिती दिली.

## अंबाजोगाईत 'जिवंत सोडणार नाही' म्हणत तरुणावर तलवारीने सपासप वार

**अंबाजोगाई :** भांडण सोडवल्याचा जुना राग मनात धरून ४ जणांच्या टोळक्याने बीडमधील कुंबेफळ येथील एका तरुणाला आधी बॅटने मारहाण केली. त्यानंतर पाठलाग करून फिर्यादीवर तलवारीने प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना अंबाजोगाई - कारखाना रोडवरील सितारा टॉकीजजवळ घडली आहे. या हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दुपारी बॅटने मारहाण, रात्री तलवारीने वार**

कुंबेफळ येथील रहिवासी परमेश्वर बाबुराव शिंपले (वय ३५) यांचा भाचा कल्याण भास्कर दंडवते याला वर्षभरापूर्वी अंबा साखर कारखान्याजवळ काही जणांनी अडवून मारहाण केली होती. त्यानंतर काही दिवसांनी आरोपी अशोक मुकुंद मोरे याच्या सातेफळ शिवारातील शेताजवळ कल्याणला पुन्हा मारहाण होत असताना, त्याचा मित्र शशिकांत सुधाकर माने याने मध्यस्थी करून ते भांडण सोडवले होते. याच गोष्टीचा राग आरोपींच्या मनात होता.

याच पूर्ववैमनस्यातून काल दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास आरोपी अशोक मुकुंद



मोरे, सैपान उर्फ सोपियान शेख, किशोर उर्फ कृष्णा मुंडे आणि रितेश चव्हाण यांनी कुंबेफळ येथील जयप्रभा शाळेजवळ शशिकांत माने याला गाठून बॅटने बेदम मारहाण केली. जखमी शशिकांतला उपचारासाठी अंबाजोगाई येथे आणण्यात आले होते.

**पाठलाग करून जीवघेणा हल्ला**

त्यानंतर रात्री १० ते १०.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी परमेश्वर शिंपले हे चुलत भाऊ वसंत शिंपले आणि भाचा कल्याण दंडवते यांच्यासह मोटारसायकलवरून अंबाजोगाईवरून गावाकडे परतत होते. त्यांची गाडी अंबा साखर कारखान्याच्या पुलाअलीकडे सितारा टॉकीजजवळ आली असता, पाठीमागून मोटारसायकलवर आलेल्या सैपान शेख, किशोर मुंडे आणि रितेश चव्हाण यांनी "तुम्हाला जिवंत सोडणार नाही," अशी धमकी देत अचानक हल्ला केला.

यावेळी आरोपी रितेश चव्हाण याने जीवे मारण्याच्या उद्देशाने परमेश्वर शिंपले यांच्या डोक्यावर तलवारीने थेट वार केला. हा वार परमेश्वर यांच्या डोक्यात लागल्याने खोल जखम झाली, तसेच तलवार भाचा कल्याण याच्या पाठीलाही लागली. फिर्यादी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून तिन्ही आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

**पोलिसांत गुन्हा दाखल**

या घटनेनंतर जखमींनी तातडीने अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी आरोपींवर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ नुसार कलम १०९, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस करत आहेत.

## बीडमधील परळी हादरले, विषारी दारूमुळे तरुणाचा मृत्यू

### तरुण हातभट्टीची दारू प्यायला, या घटनेनंतर परळी पोलिस ठाण्यासमोर आंदोलन, दारू विक्रेत्यावर मनुष्यवध गुन्हा दाखल करण्याची मागणी

**बीड :** पुण्यामध्ये विषारी दारूमुळे २२ जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच बीडमध्ये देखील अशीच घटना घडली. बीडच्या परळीमध्ये हातभट्टीची विषारी दारू प्यायल्यामुळे तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर तरुणाच्या नातेवाईकांनी परळी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. दारूबंदी करा अथवा मृतदेह पोलिस ठाण्यात आणून ठेवू असा आक्रमक पवित्रा तरुणाच्या नातेवाईकांनी घेतला आहे. दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी नातेवाईकांनी केली.



मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या परळी शहरात पुण्यासारखी पुनरावृत्ती झाली. पुणे शहरात हातभट्टी दारूमुळे अनेक तरुणांचा झाला होता. या घटनेनंतर बीडच्या परळी शहरात पुणे प्रकरणाची पुनरावृत्ती झाली. शहरातील साठे नगर भागात एका तरुणाचा विषारी हातभट्टी दारू प्यायल्यामुळे मृत्यू झाला. या तरुणांच्या मृत्यूमुळे परळीत एकच खळबळ उडाली.

तरुणाच्या मृत्यूनंतर संतप्त नातेवाईकांनी परळी पोलिस ठाण्यामध्ये ठिय्या मांडला. अनेक वेळा दारूबंदीसाठी निवेदन देत मोर्चे काढले गेले. पण पोलिसांनी कसल्याही प्रकारची कारवाई न केल्यामुळे आज एका तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. या दारू विक्रीकडे परळी पोलिसांचे कायमच दुर्लक्ष झाल्याचा नातेवाईकांनी आरोप केला आहे. दारूबंदी करावी म्हणून अनेक वेळा साठेनगर भागातील नागरिकांनी मोर्चे काढले अनेक निवेदन दिले मात्र जाणून-बुजून परळी पोलिसांचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे पाहायला मिळत आहे.

या तरुणाच्या मृत्यूला परळी पोलिस जबाबदार असल्याची नातेवाईकांची संतप्त प्रतिक्रिया दिली. आजपर्यंत परळी पोलिसांनी कुठल्याही हातभट्टी दारूवर कारवाई केली नसल्याने खुलेआम हातभट्टी दारू विक्री सुरू होते. नागरिकांनी वारंवार पोलिस ठाण्याला माहिती देऊन सुद्धा साठेनगर भागातील अंमलदार यांनी दुर्लक्ष केले आहे असे साठेनगर भागातील नागरिकांचे म्हणणे आहे. पुण्यामधील घटनेत दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. त्याच प्रकारे या तरुणाचा सुद्धा मृत्यू झाला आहे. त्यामुळे साठेनगर भागातील दारू विक्रेत्यावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करावा असे निवेदन साठेनगर मधील महिला आणि नागरिकांनी दिले आहे.

## विधानपरिषद निवडणूकीत महायुतीची सरशी ; पंकजाताई मुंडे यांनी केले नवनिर्वाचित आमदारांचे अभिनंदन

### बस्वराज पाटील यांना दिल्या शुभेच्छा

मुंबई दि. २२ --- स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत भाजपा महायुतीची सरशी झाली असून १७ पैकी १६ जागांवर महायुतीने घवघवीत यश संपादन केले आहे. आजच्या मतमोजणीनंतर विजयी झालेल्या सर्व नवनिर्वाचित आमदारांचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

विधानपरिषदेच्या निवडणूकीच्या अकरा जागांची मतमोजणी आज झाली, यात दहा जागांवर भाजपा महायुतीचे आमदार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले, एकूण १७ जागांपैकी यापूर्वी महायुतीच्या ६ जागा बिनविरोध निवडून आल्या होत्या, त्यामुळे आजच्या मतमोजणीनंतर महायुतीचे १६ आमदार विजयी झाले असून विरोधी आघाडीला एकही जागा मिळाली नाही. ना.पंकजाताईंनी बस्वराज पाटील यांचेसह नवनिर्वाचित आमदारांचे केले अभिनंदन

बीड-धाराशिव-लातूर मतदारसंघातून निवडून आलेले बस्वराज पाटील यांच्यासह मराठवाड्यातील अमर राजूरकर, सईदखान, सुहास सिरसाठ तसेच नंदकिशोर महाजन, राजेंद्र राऊत, राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, प्रवीण पोटे, धैर्यशील कदम या सर्व आमदारांचे ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन करून त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## हरित परळीचा निर्धार: हरित परळी अभियान बैठकीला परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी शहर अधिक हिरवेगार, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने नगर परिषद परळीच्या वतीने लवकरच शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड अभियान राबविण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले. तर प्रभू वैद्यनाथांच्या पावन भूमीला पर्यावरण समृद्ध करण्यासाठी एकजूट व्हा असे आवाहन जलनायक मयंक गांधी यांनी केले.


हरित परळी अभियान या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या नियोजनासाठी आज रविवार, दि. २१ रोजी सकाळी ७ वाजता जिजामाता उद्यान येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक व प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते मयंक गांधी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या बैठकीला नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी तसेच नगर परिषद पदाधिकारी, सदस्य, परळीतील वृक्ष संवर्धन चळवळीतील कार्यकर्ते, मान्यवर नागरिक, व्यापारी, पत्रकार , महिलाअधिकारी, कर्मचारी, विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वृक्ष लागवडीसाठी योग्य स्थळांची निवड, वृक्षसंवर्धनाची कार्यपद्धती तसेच नागरिकांचा सहभाग वाढविण्यासंदर्भात या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.शहरातील तापमान नियंत्रणात ठेवणे, भूजल पातळीत वाढ करणे, पर्जन्यमानाला पोषक वातावरण निर्माण करणे आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण उपलब्ध करून देणे या दृष्टीने हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.यावेळी मयंक गांधी यांच्या हस्ते नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई धर्माधिकारी यांना वृक्षरोप देऊन हरित परळी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने गुरुपौर्णिमेच्या औचित्यावर २३ ते २९ जुलै दरम्यान राज्यभरात २५ लाख वृक्ष लागवड व संवर्धन अभियान राबविण्यात येणार आहे असे मयंक गांधी यांनी सांगितले या मोहिमेत परळी नगर परिषदेने पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले. एक वृक्ष म्हणजे भविष्यातील दुष्काळाविरुद्ध उभारलेली जिवंत भिंत आहे. जलसंधारण आणि वृक्षसंवर्धन या दोन्ही चळवळी एकमेकांना पूरक आहेत. परळी शहर आणि परिसर हा वैद्यनाथ प्रभूंच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेला भाग असून या संपूर्ण परिसराला हिरवाईने नटविण्याचा ठाम निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये आणि नागरिकांच्या सहभागातून हे अभियान लोकचळवळ बनविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## "तू का मधे पडतोस"म्हणत तरुणाची हत्या

### संतप्त नातेवाईकांनी रात्री रस्ता रोको केल्यावर 9 जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल.

बीड (प्रतिनिधी) केज तालुक्यातील टाकळी येथील तरुण विलास नवनाथ घुले (वय २५)हा भांडण सोडवण्यासाठी गेल्यानंतर त्याच्यावरच चाकू हल्ला करण्यात आला त्यात तो गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात ९ जणांविरुद्ध खुनासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जून २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास केज-बीड रोडवरील रेणु बार व समोरील बंद असलेल्या समर्थ बिअर बारसमोर हा प्रकार घडला. आरोपी व साक्षीदार यांच्यात सुरू असलेल्या भांडणात विलास घुले मध्यस्थी करण्यासाठी गेला असता, "तू का पडतोस?" असे म्हणत आरोपींनी त्याच्यावर हल्ला केला. यातील आरोपी रामेश्वर गायकवाड याने जिवे मारण्याच्या उद्देशाने विलासच्या पोटात चाकू खुपसल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

विलास घुलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती मिळताच कुटुंबीय व गावकऱ्यांनी केज पोलीस ठाण्यात धाव घेत शिवाजी चौकात रात्री उशिरापर्यंत रस्ता रोको करण्यात आला यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

गंभीर जखमी झालेल्या विलास घुले याच्यावर उपचार सुरू असताना २१ जून रोजी सायंकाळी त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर संतप्त नातेवाईक व ग्रामस्थांनी केज पोलीस ठाणे परिसरात गर्दी करत शिवाजी चौकात रस्ता रोको आंदोलन केले. रात्री उशिरापर्यंत आंदोलन सुरू होते.

या प्रकरणी मयताचा भाऊ रमेश नवनाथ घुले (रा. टाकळी, ता. केज) यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३९२/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये बाबासाहेब गुरुबा कदम, मंगेश गुरुबा कदम, रामेश्वर गायकवाड, शुभम रामभाऊ गायकवाड, भैय्यासाहेब गायकवाड, अजय उर्फ बंकट कदम, नवनाथ परसराम कदम, दीपक परसराम कदम आणि संतोष नरहरी कदम यांचा समावेश आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून फरार आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांकडून हालचाली सुरू आहेत.

## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**बीड (प्रतिनिधी):** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे रविवार (दि.२१) रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाच्या "योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ" या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानसाधनेचे प्रात्यक्षिक सादर केले. प्राचार्या उमा जगतकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

## कर्जमाफी व पिकविम्यासाठी वांगी बु येथे 'एक गाव अन्नत्याग आंदोलन

### माजलगाव तालुक्यातील वांगी बु येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने आंदोलन

**माजलगाव :** शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजलगांव तालुक्यातील वांगी बु येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने सोमवारी (दि. २२) सकाळी १० वाजता 'एक गाव अन्नत्याग आंदोलन' सुरू करण्यात आले. या आंदोलनात परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी शेतकऱ्यांनी कर्जमाफी व पिकविम्याच्या मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी करत शासनाकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही सरसकट सर्व शेतकऱ्यांना लागू करण्यात यावी, मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्यानुसार बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७ हजार ५०० रुपये पिकविमा सरसकट मंजूर करण्यात यावा, तसेच खरीप हंगाम २०२६ च्या पीकविमा योजनेत पूर्वीप्रमाणे "चार ट्रिगरचा समावेश' करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांचा



समावेश होता.

दि. २२ जून रोजी सकाळी १० वाजता आंदोलनास सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

राज्यातील शेतकरी सध्या आर्थिक संकटातून जात असून अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि उत्पादन खर्चात झालेली वाढ यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने कर्जमाफी व पिकविमा संदर्भातील मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांनी शासनाने लवकरात लवकर मागण्या मान्य न केल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला. या आंदोलनामुळे परिसरात शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून शासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कॉम्रेड्स मॅरेथॉनचे सातही शिलेदार बीडच्या अभिमानाचे मानकरी : शंकर देशमुख

### भाजपकडून सत्कार

**बीड, दि. २१ जून :** दक्षिण आफ्रिकेत पार पडलेल्या जगप्रसिद्ध आणि अत्यंत खडतर समजल्या जाणाऱ्या कॉम्रेड्स मॅरेथॉन अप रन (८७ किमी) स्पर्धेत सहभागी झालेल्या बीड जिल्ह्यातील सातही धावपटूंनी निर्धारित कट-ऑफ वेळेत स्पर्धा पूर्ण करून इतिहास घडविला. या अभूतपूर्व यशाबद्दल आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, बीड जिल्ह्याच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

जगभरातील धावपटूंसाठी प्रतिष्ठेची मानली जाणारी कॉम्रेड्स मॅरेथॉन ही शारीरिक आणि मानसिक क्षमतेची कठोर परीक्षा असते. अशा स्पर्धेत बीडच्या सातही शिलेदारांनी जिद्द, चिकाटी, शिस्त आणि अथक परिश्रमाच्या बळावर ८७ किलोमीटरचे आव्हान यशस्वीरित्या पूर्ण करून जिल्ह्याचा तसेच देशाचा गौरव जागतिक स्तरावर उंचावला.

**स्पर्धेतील त्यांची कामगिरी पुढीलप्रमाणे :**

* शरद खिल्लारे – ८ तास ४५ मिनिटे
* प्रभाकर जाधव (मेजर) – १० तास २० मिनिटे



* डॉ. संजय जानवळे – १० तास ३३ मिनिटे
* डॉ. विश्वास गवते – १० तास ४१ मिनिटे
* कल्याण कुलकर्णी – ११ तास १० मिनिटे
* हरी ठोंबरे – ११ तास २५ मिनिटे
* डॉ. अमोल मोराळे – ११ तास ४४ मिनिटे

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते या सातही मान्यवरांचा शाल, श्रीफळ पुष्प देऊन गौरव करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या धावपटूंच्या ऐतिहासिक कामगिरीचे स्वागत केले.

दरम्यान, भारतीय जनता पार्टी, बीडच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग प्रशिक्षकांनी उपस्थितांना योग, प्राणायाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले. महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषदेच्या सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी तसेच के.एस.के. महाविद्यालयाच्या २५० एनसीसी कॅडेट्सनी शिस्तबद्ध योग प्रात्यक्षिके सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर, ॲड. सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, सलीम जहांगीर, अशोक लोढा, शिवाजी मुंडे, मीरा गांधले, शांतिनाथ डोरले, डॉ. लक्ष्मण जाधव, प्रा. देविदास नागरगोजे, बालाजी पवार, गणेश पुजारी, अमोल वडतीले, राजू शहाणे, प्रीत कुकडेचा, संध्या मिश्रा, सोनल पाटील अशोक घोडके, नरेश पवार, भालचंद्र कुलकर्णी, राजेश चरखा आदीं उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी, युवक-युवतींना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दादासाहेब नन्नवरे, भाग्यश्री ढाकणे, ओमप्रकाश गिरी आणि सुनील गलांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कॉम्रेड्स मॅरेथॉनमध्ये बीडच्या सातही धावपटूंनी केलेली ऐतिहासिक कामगिरी ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून त्यांचा हा पराक्रम अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, अशा भावना यावेळी

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नामांकीत मराठी शाळांकडून वसतीगृह चालकांकडे विद्यार्थ्यांसाठी आर्थिक व्यवहार?

## व्हॅन चालक, जि.प. शाळेतील मुख्याध्यापकांनाही विद्यार्थ्यांसाठी ऑफर

**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २१ जून**

नामांकीत मराठी शाळांमधील शिक्षक अतिरिक्त ठरू नयेत तसेच शाळांची पटसंख्या वाढावी यासाठी शहरातील काही नामांकीत शाळांकडून शहरातील काही वसतीगृह चालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत प्रवेश देण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण होत असल्याची चर्चा सध्या शिक्षण क्षेत्रात सुरू आहे. तसेच ग्रामीण भागातून शिक्षणासाठी मुलामुलींना घेवून येणाऱ्या व्हॅन व ऑटो चालकांनाही या नामांकीत शाळांनी पॅकेज देण्यात येत आहे. जिथे पाचवी पर्यंत शाळा आहे किंवा सातवी पर्यत शाळा आहे अशा शाळांच्या मुख्याध्यापक किंवा तेथील शिक्षकांनाही आमिष दाखविले जात आहे. शिक्षण क्षेत्रात यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

शहरात मोठ्या संख्येने विना अनुदानीत इंग्रजी शाळांचे पेव फुटले आहे. शिक्षण विभागाकडून नियम धाब्यावर बसवून अनेक विनाअनुदानीत इंग्रजी शाळांना मान्यता देण्यात येत आहे. या शाळांमध्ये पालकांकडून भरमसाट शुल्क, पुस्तके, गणवेश यासाठी पैसे उकळले जात आहेत. इंग्रजी माध्यमाच्या नावाखाली या शाळांकडून मोठ्या प्रमाणावर शुल्क आकारले जात असतांना शिक्षण विभाग मात्र डोळेझाक करीत आहे. आकर्षक इमारत आणि मोठमोठ्या जाहीराती या शाळांकडून केल्या जात असल्यामुळे पालकांचा या शाळेकडे कल वाढला आहे. त्यातच इंग्रजी माध्यम असल्यामुळे पालकही कसलाही विचार न करता पोटाला चिमटा घेवून या शाळांमध्ये पाल्याचा प्रवेश निश्चित करीत आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मागील दोन ते तीन वर्षात शहरात वाढ झाल्यामुळे जिल्हा परिषद आणि अनुदानीत मराठी माध्यमांच्या शाळांना याचा मोठा फटका बसत असतांना दिसत आहे.

शहरातील जिल्हा परिषद बहुविध प्रशाला, कन्या प्रशाला येथील विद्यार्थी संख्या बोटावर मोजण्या इतकी शिल्लक राहीली आहे. अनेक शिक्षक अतिरिक्त ठरत असल्यामुळे त्यांचे इतरत्र समायोजन होत असतांना दिसत आहे. परंतु मागील अनेक वर्षापासून हिंगोली शहरात नामांकीत असलेल्या शाळांनाही आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांमुळे विद्यार्थी संख्या कायम ठेवणे म्हणजे तारेवरची कसरत झाली आहे.

हिंगोली शहरात ग्रामीण भागातून शिक्षणासाठी अनेक विद्यार्थी येतात. या विद्यार्थ्यांचे शहरातील खाजगी वसतीगृहात राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली जाते. अनेक वसतीगृहात ५० ते १०० पर्यंत विद्यार्थी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पालकांकडून वार्षिक किंवा महिनेवारी वसतीगृह चालक शुल्क आकारतात. तसेच पालकांना विद्यार्थ्यांचा नामांकीत शाळेत प्रवेश करून देण्याची हमीही देतात. ग्रामीण भागातील पालकही विश्वासाने वसतीगृह चालकांवर भरवसा ठेवून पाल्याला शिक्षणासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करण्यासाठी तयार होतात. याचाच गैरफायदा घेत तसेच नामांकीत शाळांमध्ये प्रवेश करून घेतात परंतु मागील दोन ते तीन वर्षापासून काही वसतीगृह चालकांना आता भाव आला असल्याचे दिसत आहे. शाळेतील पटसंख्या कायम ठेवण्यासाठी तसेच शिक्षक अतिरिक्त ठरू नये यासाठी नामांकीत शाळेसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. यासाठी नामांकीत शाळांनी एक नवीन फंडा काढला असून जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या वसतीगृह चालकांना संपर्क साधून ५ ते ८ पर्यंतचे प्रवेश देण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांमागे विशिष्ट रक्कम देण्यात येत आहे. याचा फायदा काही वसतीगृह चालक घेत असतांना दिसत आहेत. शाळेतील मुख्याध्यापक, संस्थाचालक यांच्या माध्यमातून प्रवेश देण्यात येत आहेत.

एकेकाळी या नामांकीत शाळेत प्रवेश घेण्यासाठी पालकांच्या रांगा लागत होत्या, शहरातील प्रतिष्ठित व्यक्तीची शिफारस आणल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत होता परंतु आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव आणि अतिरिक्त शिक्षक होऊ नये यासाठी शाळांना वसतीगृह चालक, व्हॅन चालक, ऑटो चालक तसेच ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापक किंवा शिक्षकांकडे उंबरठे झिजवण्याची वेळ आली आहे. मराठी शाळेसमोर विद्यार्थी टिकवणे आणि शिक्षक टिकवणे हे फार मोठे आव्हान उभे ठाकले असून यास संपूर्ण शिक्षण व्यवस्था जबाबदार असल्याचे बोलले जात आहे.

# वीज प्रश्न मार्गी लावण्यासाठी शिवाजी मुटकुळे यांची अधिकाऱ्यांना भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जून**

शहर व ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने खंडित होणारा वीज पुरवठा आणि सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना येणारी अव्वाच्या सव्वा वीजबिले या गंभीर समस्यांवर भाजपा युवामोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे यांनी पक्षाचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिकांसह महावितरणच्या मुख्य कार्यालयात जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि हिंगोलीचा वीज प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीला महावितरणचे हिंगोली येथील कार्यकारी अभियंता चव्हाण, सर्व उपविभागीय अधिकारी आणि विभागातील प्रमुख तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत शिवाजी मुटकुळे यांनी नागरिकांच्या समस्या मांडताना सांगितले की, हिंगोली शहरातील विविध नागरी वस्त्यांमध्ये तांत्रिक बिघाडामुळे तासनतास वीज गुल होण्याचे प्रमाण अत्यंत वाढले आहे. पावसाळ्याच्या दिवसांत नागरिकांना अंधारात राहावे लागू नये, यासाठी महावितरणने तातडीने पर्यायी वीजवाहिन्या कार्यान्वित कराव्यात आणि दुरुस्ती पथके २४ तास सज्ज ठेवावीत.तसेच ग्रामीण भागात शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेशी आणि योग्य दाबासह वीज मिळाली पाहिजे. ग्रामीण भागात जळालेले डीपी आणि ट्रान्सफॉर्मर बदलण्यासाठी महावितरणकडून होणारी दिरंगाई त्वरित थांबवून हे ट्रान्सफॉर्मर विनाविलंब बदलून देण्यात यावेत. तसेच टोल-फ्री क्रमांकावर येणाऱ्या ग्राहकांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्यावी आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी कार्यालयात बसून न राहता नागरिकांशी थेट संवाद ठेवावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यातील सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून वीज पुरवठा सुरळीत करण्याचे ठोस आश्वासन दिले आहे.

या बैठकीला नगरसेवक हमिद प्यारेवाले, अजय गायकवाड, उमेश गुठ्ठे, रामरतन शिंदे, ॲड. राजु गोटे, विलास गोरे, बाबा घुगे, रजनीश पुरोहित, पवन उपाध्ये यांच्यासह परिसरातील स्थानिक नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोलीच्या मतदानावर शिंदेसेनेचे सईद खान यांचा विजय!

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

हिंगोली विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे सईदखान यांचा विजय झाला असला तरी हिंगोलीच्या मतदानावरच त्यांना विजय मिळविता आला आहे. हिंगोली जिल्हयातून १३२ पैकी तब्बल ११८ मतदान सईदखान यांना मिळाली. त्यासाठी शिंदेसेनेचे आ. संतोष बांगर यांच्यासह आ. नवघरे, आ. मुटकुळे यांनी घेतलेले परिश्रम फाळाला आल्याचे बोलले जात आहे.

परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुक सुरवातीपासूनच चर्चेचा विषय बनली होती. या मतदार संघात राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) अधिक असल्याने हि जागा राष्ट्रवादीला सोडावी अशी मागणी आमदार राजेश नवघरे यांनी केली होती. मात्र ही जागा शिवसेनेची असल्याने जागा शिवसेनेकडेच राहणार हे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर शिंदेसेनेकडून माजी आमदार विप्लव बाजोरीया यांनी उमेदवारीसाठी वरिष्ठ पातळीवरून फिल्डींग लावली होती. तर अभिमन्यू खोतकर यांनीही उमेदवारी मागितली दोघांपैकी एकाला उमेदवारी मिळेल अशी गणिते मांडली जात असतांना ऐनवेळी शिंदेसेनेचे अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष सईदखान यांना उमेदवारी देण्यात आली.

दरम्यान, परभणी-हिंगोली जिल्ह्यात महायुतीचे पारडे जड होते. मात्र ठाकरे गटाकडून डॉ. विवेक नावंदर व अपक्ष म्हणून सुशील देशमुख यांची उमेदवारी असल्याने निवडणुकीत चुरस निर्माण झाली होती. त्यातच महायुतीकडे ३४९ मतदान तर महाविकास आघाडीकडे १०२ मतदान होते. त्यामुळे सईदखान यांचा विजय सोपा असल्याचे बोलले जात होते. मात्र देशमुखांच्या उमेदवारी मुळे मतविभाजन होणार हे स्पष्ट झाले होते.

दरम्यान, तीनही उमेदवारी परभणी जिल्ह्यातील असल्याने त्या ठिकाणी दगाफटका होईल अशी भिती व्यक्त होत असल्याने हिंगोली जिल्हयातील १३२ मतदारांकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. त्यासाठी शिंदसेनेचे आ. संतोष बांगर यांनी महायुतीचे आ. राजेश नवघरे, आ. तान्हाजी मुटकुळे यांची मोट बांधून क्रॉस मतदान होणार नाही याची दक्षता घेतली. मतदानाच्या दिवशीही आमदार बांगर यांनी मतदारांना सोबत घेऊन एकगठ्ठा मतदान करून घेतले. दरम्यान, या निवडणुकीत एकूण ४६५ मतदान झाले. त्यामध्ये हिंगोली जिल्हयातून १३२ मतदानापैकी ११८ मतदान सईदखान यांना मिळाले तर परभणी जिल्हयात ३३४ पैकी १२४ मतदान सईदखान यांना मिळाले. मतदानाची आकडेवारी लक्षात घेता हिंगोलीच्या मतांवरच सईदखान यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाल्याचे चित्र दिसून येत आहे.



**हिंगोली- परभणी-हिंगोली विधान परिषदेत महायुतीचे उमेदवार सईद खान यांचा विजय झाल्यानंतर येथील गांधी चौकात महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा केला. यावेळी युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, शिवसेनेचे न प गटनेते श्रीराम बांगर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज हिंगोलीत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदूवर शस्त्रक्रिया शिबीर

हिंगोली- मोहरम निमित्त एमईसी वेलफेअर फाउंडेशन आणि व्यंकटेश नेत्रालय, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २४ जून २०२६ रोजी शहरातील मेराज चौक येथील आयकॉन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये भव्य मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणाऱ्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची मोफत नेत्र तपासणी केली जाणार आहे. शिबिरात गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यासोबतच मोतिबिंदूवरील शस्त्रक्रियाही मोफत केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले व पंतप्रधान जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांवर रेटिना शस्त्रक्रिया देखील निःशुल्क केली जाणार आहे. फेको तज्ज्ञ डॉ. किशन दत्तराम लखमावार आणि रेटिना तज्ज्ञ डॉ. प्रतिक किशन लखमावार हे या शिबिरात रुग्णांना मार्गदर्शन व उपचार करणार आहेत. या सेवाभावी उपक्रमाचा जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शेख निहाल भैय्या यांच्यावतीने करण्यात आले आहे. शिबिरासाठी नोंदणी निहाल भैय्या संपर्क कार्यालय, हिंगोली येथे सुरू असून ९२८४२४७०३७ किंवा ८०८०२२२४७५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळवले आहे.

# भाजपच्या विशेष संपर्क अभियाना निमित्त खा. वडकुते यांच्या भेटी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

भारतीय जनता पक्षाच्या विशेष जनसंपर्क अभियानांतर्गत राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांनी हिंगोली शहराचा दौरा करून विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या निवासस्थानी सदिच्छा भेटी दिल्या. या दौऱ्यात त्यांनी नागरिकांशी संवाद साधत केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली.

या अभियानांतर्गत खा. वडकुते यांनी हिंगोलीतील प्रसिद्ध कंत्राटदार राम कयाल यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली व शहरातील नागरी सुविधांबाबत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रसिद्ध 'एम. टी. ज्वेलर्स'चे प्रदीप वर्मा यांच्याशी संवाद साधला, तसेच स्थानिक डेंटल कॉलेजलाही सदिच्छा भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी शहरातील विविध घटकांशी चर्चा करून नागरिकांच्या अडीअधिवेशने व अडीअडचणी जाणून घेतल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती हाती. या अभियानाला शहरवासीयांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# पारडा येथील दुहेरी खून प्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

## गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

तालुक्यातील पारडा शिवारातील दुहेरी खून प्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात बासंबा पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करीत असून तीन संशयीतांची चौकशी सुरू केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील पारडा शिवारातील शेतात बळीराम देवबा वाघमारे वय ६५ आणि कलावतीबाई बळीराम वाघमारे वय ६० यांचे मृतदेह दि १९ शनिवारी आढळून आले होते. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले होते. दोन्ही मृतदेहावर उत्तरीय तपासणी झाल्यानंतर दोघांच्याही शरीरावर शस्त्राने वार करून त्यांचा खून केल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी अनिल वाघमारे यांच्या तक्रारीवरून बासंबा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. बासंबा पोलिस ठाण्याचे सपोनि विकास आडे, उपनिरीक्षक संदीप जमादार, उपनिरीक्षक मदन गव्हाणे यांनी तपास सुरू केला आहे तर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक माधव जिव्हारे, दिलीप मोरे यांच्या पथकानेही समांतर तपास सुरू केला आहे.

या प्रकरणात पोलिसांनी तीन संशयीतांची चौकशी सुरू केली आहे. याशिवाय मयतांच्या नातेवाईकांकडून माहीती घेण्याचे प्रयत्न पोलिसांनी सुरू केले आहेत. पुढील तपास बासंबा पोलिस करीत असून लवकरच या दुहेरी खून प्रकरणाचा छडा लावण्यात येईल असा विश्वास व्यक्त केला आहे.

# पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तपासण्या करा- गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

जिल्ह्यात गर्भलिंग निदान व अनधिकृत गर्भपाताच्या घटनांना आळा घालण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची नियमित आणि अचानक तपासणी करून आवश्यक तेथे कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पीसीपीएनडीटी टास्क फोर्सची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा (पीसीपीएनडीटी) अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

राज्यात तसेच सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये पोर्टेबल सोनोग्राफी मशिनचा वापर वाढत असल्याची बाब लक्षात घेऊन जिल्ह्यात अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा व तालुका समुचित प्राधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, वेळोवेळी केंद्रांना भेटी देऊन तपासण्या कराव्यात आणि आवश्यक त्या कायदेशीर कारवाया कराव्यात, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

बैठकीत जिल्ह्याच्या लिंगगुणोत्तर प्रमाणाचा आढावा घेण्यात आला. सन २०२३ मध्ये हे प्रमाण १००० मुलांमागे ८९७ मुली इतके होते. सन २०२४ मध्ये ते वाढून १००० मुलांमागे ९६१ मुली इतके झाले असून यात ६४ अंकांची वाढ झाल्याची माहिती देण्यात आली. पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची त्रैमासिक तसेच अचानक तपासणी करण्याचे, तसेच आवश्यकतेनुसार स्टिंग ऑपरेशन व डिकॉय केसेस राबविण्याच्या सूचना सर्व समुचित प्राधिकाऱ्यांना देण्यात आल्या. अनधिकृत गर्भपात रोखण्यासाठीही विशेष मोहिमा राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

गर्भलिंग निदानाविरोधात सामाजिक स्तरावर व्यापक जनजागृती करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. बक्षीस योजना, तक्रार नोंदणीची सुविधा, संकेतस्थळ आणि हेल्पलाईन क्रमांक यांची अधिकाधिक प्रसिद्धी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जिल्ह्यात यापूर्वी ११ सोनोग्राफी केंद्रांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून सध्या ३ प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. समुचित प्राधिकाऱ्यांकडून नियमित तपासण्या, धडक मोहिमा आणि जनजागृती उपक्रम राबविले जात असून समाजात मुलींचे महत्त्व पटवून देण्यासाठी समुपदेशनही केले जात आहे. गर्भलिंग निदान किंवा अनधिकृत गर्भपाताबाबत माहिती असल्यास नागरिकांनी संकेतस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक १८००२३३४४७५ वर तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

# हिंगोलीत भाजपचे जनसंपर्क अभियान, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळेंचा नागरिकांशी संवाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

भारतीय जनता पार्टी हिंगोली विधानसभा मतदारसंघाच्यावतीने हिंगोली शहरात व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रविवारी भाजप युवामोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी शहरातील विविध भागांचा दौरा केला. यावेळी त्यांनी शहरातील नामांकित उद्योजक, डॉक्टर्स, वकील, विविध क्षेत्रांतील प्रभावी व्यक्तींच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या 'विश्वास, विकास आणि जनकल्याण' या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त हा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या भेटींदरम्यान केंद्र सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या विविध जनकल्याणकारी योजना, ऐतिहासिक विकासकामे आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची माहिती मुटकुळे यांनी नागरिकांना दिली. या अभियानांतर्गत हिंगोलीतील ज्येष्ठ व्यापारी रमेशचंद्र बगडिया, ॲड. पी. के. शिरसाठ, डॉ. किशन लखमावार, डॉ. संजय नाकाडे, अभियंता अशोक अग्रवाल, डॉ. अखिल अग्रवाल, मयुर कयाल आणि नरेश अग्रवाल,ॲड.इंगळे यांच्या निवासस्थानी भेटी देण्यात आल्या. यावेळी स्थानिक समस्या, व्यापारी आणि व्यावसायिकांचे प्रश्न तसेच शहराच्या विकासा संदर्भातील विविध सूचना व नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेण्यात आल्या.

जनतेच्या प्रत्येक प्रश्नाचे सकारात्मक निराकरण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटिबद्ध असून त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील. जनतेचा विश्वास आणि लोकसहभाग यातूनच हिंगोलीच्या विकासाचा मार्ग अधिक मजबूत होत आहे, असा विश्वास युवामोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी भाजपचे जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, ॲड.अमोल जाधव, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, वैजनाथ शिंदे उपस्थित होते.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पालेभाज्यांची आवक घटली



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : यंदा मान्सूनच्या सुरुवातीला अपेक्षित पाऊस न पडल्याने त्याचा परिणाम आता भाजीपाला बाजारावर झालेला दिसून येत आहे. विशेषतः पालेभाज्यांच्या उत्पादनात घट झाल्याने बाजारातील आवक कमी झाली आहे.

दरात मात्र लक्षणिय वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांसह गृहिणींचे मासिक बजेट कोलमडू लागले आहे. शहरातील घाऊक व किरकोळ भाजी बाजारात मेथी, पालक, शेपू, चुका, कोथिंबीर यासारख्या पालेभाज्यांचे दर गेल्या काही दिवसांत वाढले आहेत. कमी पावसामुळे अनेक भागातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनावर अवलंबुन राहावे लागत आहे. पाण्याअभावी लागवडीचे क्षेत्र कमी झाले असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर झाला आहे.



## विविध वृत्त...

### डॉ. नितीन जोशी यांची कोलकाता राष्ट्रीय एंडोलाईव्ह परिषदेसाठी निवड



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २२ जून : वलांडीसह संपूर्ण देवणी तालुक्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे गॅलेक्सी हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. नितीन जोशी यांची कोलकाता येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील कोलकाता एंडोलाईव्ह-२०२५ परिषदेसाठी फॅकल्टी म्हणून निवड झाली आहे. २७ व २८ जून रोजी होणाऱ्या या परिषदेत देशभरातील नामवंत तज्ज्ञ सहभागी होणार असून डॉ. जोशी यांना आपल्या अनुभव व आधुनिक एंडोस्कोपी तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्याची संधी मिळणार आहे.

ग्रामीण भागात अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या डॉ. जोशी यांनी अल्पावधीतच वैद्यकीय क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील सहभागामुळे वलांडी, देवणी व मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

याबाबत नागरिक, रुग्ण, वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी तसेच विविध सामाजिक संघटनांकडून डॉ. नितीन जोशी यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### आरटीओ कर्मचाऱ्यांचा संप सुरुच

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : आरटीओ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी विविध मागण्यांसाठी आक्रमक पवित्रा घेत दि. १६ जूनपासून बेमुदत संप पुकारला आहे. दरम्यान शासनाच्या वतीने उद्याप कसलाही प्रतिसाद मिळत नसल्याने हा संप सुरुच ठेवण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. दरम्यान या संपामुळे कर्मचाऱ्यांची विविध कार्यालयीन कामे करण्यासाठीची पूर्ण जबाबदारी ही मोटार वाहन निरीक्षकांवर आली आहे. लातूर प्रादेशिक परिवहन विभागातील ६० कर्मचारी संपावर गेले आहेत. संप सुरु असल्याच्या पार्श्र्वभूमीवर आवश्यक कागे वगळता अनेक वाहनधारकांनी आरटीओ कार्यालयाकडे पाठ फिरवली आहे

### मिनी मार्केट रस्त्यावरील खड्डयांमुळे वाहनधारक त्रस्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि २२ जून : शहरातील मिनी मार्केट परिसरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाच्या पाण्यामुळे खड्यांमध्ये पाणी साचत असल्याने या खड्यांचा अंदाज वाहनधारकांना येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. दुचाकीस्वार आणि ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. हा मार्ग शहरातील प्रमुख मागधिकी एक असल्याने दररोज हजारो वाहनांची ये-जा होत असते. संबंधीत विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करुन खड्डे बुजवावेत, अशी मागणी नागरिक व व्यापा-यांनी केली आहे

### कामधेनू गोशाळेस चारा कडबा दान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : जिल्हावार दाम्पत्याने शहरातील कामधेनू गोशाळेत जाऊन गोमातांसाठी एक गाठीभर चऱ्याचा कडबा दान केला गोसेवा हिच खरी ईश्र्वरसेवा मानून केलेल्या या उपक्रमामुळे समाजात गोसेवेचा एक नवा पायंडा पडला आहे. त्यांच्या या सामाजिक जाणिवेचे आणि दातृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे

# आरोग्य निरोगी राहण्यासाठी वर्षभर योगासने करा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : जगभरातील जवळपास१७० देशांमध्ये योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला लातूरमध्ये ही डॉ . बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जिल्हा प्रशासन, लातूर शहर महानगरपालिक, पतंजली योग समिती, प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .

यावेळी जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांनी . आरोग्यासोबत च पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे . असा संकल्प करण्याचे आवाहन केले .

हा योगदिन लातूर जिल्ह्यातील विविध शाळा, महाविपाल ये, संस्था, सरकारी कार्यालये येथे उत्साहात साजरा करताना काही योगासनेही नागरिकांना करून दाखविण्यात आली . त्यातून

निरोगी, आनंदी आणि संतुलित जीवनासाठी योग आवश्यक आहे . नियमित योगासनामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता वाढत जाते तसेच करे योग, रहे निरोग . हा संदेश मिळाला . यासोबतच योगासने आणि प्राणायम करणे आवश्यक असून अनुलोम-विलोम, कपाल भारती, भस्त्रिका, सूर्य नमस्कार, हास्यासन, शवासन, शीर्षासन, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन असे विविध योगासने करून आपले जीवन सुखी, समाधानी आणि निरोगी बनवावे आणि योगी व्हा, निरोग राहा असा संदेश उपस्थितांना मिळाला .यावरून जीवनात निरोगी रहायचे असेल तर योगासना शिवाय तरणोपाय नाही असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. कारण आजची जीवनशैली बदलली असून माणूस आळशी बनत चालता आहे . व्यायाम शून्य जीवन शैली बनत आहे . प्रत्येका कडे वाहन असल्यामुळे तसेच व्यायामाच्या अभावामुळे आणि संकरीत खाण पान यामुळे नको नको ते नवनवीन आजारांना जणू आपण आमंत्रण च देत असतो .

पूर्वीच्या काळी निरसे दूध पिले जायचे . वाहने नसल्यामुळे पायी फिरणे व्हायचे त्यामुळे भूक लागायची, तसेच अंगमेहनतीचे कामे करावे लागायचे . तसेच सकस आहार घ्यायचे . कोणात्यात मालात बेसळ नसायची जसे दूध, तुप , भाजीपाला . आज सगळीकडे प्रत्येकात बेसळ होत आहे . ज्वारी, गहू, भाजीवाला, दूध . तुप यात बेसळ दिसून येत असल्यामुळे आरोग्याच्या तक्रारी उदभव लागल्या आहेत

यामुळेच तर आज डॉक्टरांची दुकाने गल्ली - बोळात मोठ्या दिमाखात उभी राहताना आपण पाहातो आहोत .

त्यामुळे आपले, आपल्या कुटुंबाचे आरोग्य निरोगी रहावे असे वाटत असेल तर योगासनाशिवाय पर्याय नाही . फक्त योग दिन आला म्हणून त्या दिवशी भल्या पहाटे उठून योग करून चालणार नाही . तर वर्षभर योग करणे आवश्यक आहे . तरच आपण निरोगी राहू शकतो . आपण खातो - पितो यात भेसळ असून सगळा सरकारी खतांवर आलेले धान्य खातो . गावरान खतं मिळत नाहीत . शेतकरी तरी काय करणार ? त्यामुळे तरी किमान वर्षभर योग करणे आवश्यक असून यातून नच आपले, आपल्या कुटुंबाचे आरोग्य निरोगी राहील .

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा निलंगेकरांकडून आभारपर सत्कार



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २२ जून : शहरातील व तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जागृती कारखान्याच्या वतीने सन२०२५/२६ गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सहकार महर्षी. दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उच्चांकी प्रतिमेट्रिक टन ३१७७ रुपये ऊस दर दिल्याबद्दल लातूर जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक तथा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष. अशोकराव शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली व प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव. महादेव आवाळे,नगरसेवक. सुधीर लखनगावे,राष्ट्रवादी शहराध्यक्ष. व्यंकट हांद्राळे यांनी जागृती शुगर्सचे संस्थापक. दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

या वेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव. महादेव आवाळे यांनी दिलेला शब्द पाळण्याची परंपरा ही देशमुख परिवाराची असून बोले तैसा चाले,त्याची वंदावी पाऊले या संतवचनाची प्रचिती पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री,विकासरत्न स्व.विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या मांजरा परिवारातील सर्व कारखान्याच्या माध्यमातून आली असून हा उच्चांकी प्रतिमेट्रिक टन ऊस दर आपल्या भागातील शेतकरी यांना फक्त आणि फक्त माजी मंत्री तथा सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नेतृत्वामुळे शक्य झाले अशी भावना व्यक्त केली.

या वेळी नगरसेवक. सुधीर लखनगावे यांनी दुष्काळाच्या सावटाखाली सापडलेल्या शेतकऱ्यांना उच्चांकी दर दिल्यामुळे बळीराजाच्या जिवनात मोठा आधार जागृती कारखान्याच्या माध्यमातून मिळाला आहे.या मुळे शेतकरी खुप समाधानी असून हे सर्व सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या नियोजन , दुर दृष्टीमुळे शक्य झाले अशी भावना व्यक्त केली या वेळी शिंदे,अग्रवाल, शिवणे,ओम आवाळे आदी उपस्थित होते.

## श्रीराम विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन योगासन,प्राणायाम करून साजरा



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २२ जून : श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेनापुर व पतंजली योग समितीच्या वतीने आज दिनांक २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला .

याप्रसंगी प्राचार्य अनिल कुटवाड . शिक्षण विस्तार अधिकारी सुदर्शन लहाने ,श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक चंचला वलसे ,उपप्राचार्य प्रा .भरत धायगुडे , प्रा .पर्यवेक्षक जुबेर खान पठाण . सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी , प्रा . लहुकांत शेवाळे , पतंजली योग समितीचे तालूकाध्यक्ष योगाशीक्षक सतीश मोरे, महिला तालूकाध्यक्ष सुरेखा बस्तापुरे यांची उपस्थिती होती . याप्रसंगी धोंडीराम मामडगे,जयप्रकाश हलकुडे , नगरसेवक सचिन मोटेगावकर , नामदेव साबदे,यांची उपस्थिती होती . याप्रसंगी प्राचार्य अनिल कुटवाड यांनी प्राणायाम आणि योगाचे महत्त्व सांगून सशक्त आणि समृद्ध भारतासाठी सातत्याने व नियमित योग प्राणायाम केला पाहिजे असे सांगितले तर योगशिक्षक सतीश मोरे व सुरेखा बस्तापुरे यांनी विविध प्राणायाम व योगासनांचे मार्गदर्शन केले .अनुलोम-विलोम, भस्त्रिका ,कपालभाती ,सूर्य नमस्कार , हास्यासन ,शवासन शीर्षासन ,इत्यादी योगासने व प्राणायाम याचे प्रात्यक्षिक दाखवले व उपस्थिततांकडून प्रात्यक्षिक करून घेतले .

या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक,पालक ,विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . लहुकांत शेवाळे यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी यांनी मानले .याप्रसंगी शिवाजी अकनगिरे,धोंडीराम मामडगे शशीकुमार अकनगिरे. बालाजी हंबीरे ,संजय म्हेत्रे,सत्यपाल राउत ,काशीनाथ दळवी व ग्रामस्थ उपस्थित होते

## लातुरात महेश नवमीनिमित्त आज भव्य शोभायात्रा

तभा वृत्तसेवा

लातूर : लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने महेश नवमीचे औचित्य साधून मंगळवार, दि. २३ जून २०२६ रोजी दुपारी चार वाजता छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेचा शुभारंभ सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, व्यापारी धर्मशाळेची अध्यक्ष रमेश राठी, उद्योजक अशोक भुतडा, धनराज भुतडा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गौरीशंकर मंदिरापासून निघालेली ही शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशालेच्या प्रांगणात विसर्जित होणार आहे. शोभायात्रेचे विशेष आकर्षण माहेश्र्वरी ढोलताशा पथक असणार आहे. या शोभायात्रेचे संयोजक ईश्र्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्र्वर चांडक, दिनेश गिल्डा हे आहेत. या शोभायात्रेत माहेश्र्वरी समाजातील बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष प्रकाश कासट , सचिव राजेश मंत्री, संगठन मंत्री फुलचंद काबरा, जगदीश भुतडा यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# निरोगी राहण्यासाठी योगाचा अंगीकार करावा

## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड लातूरमध्ये जागतिक योगदिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असलेला योग आज जागतिक पातळीवर स्वीकारला गेला असून, निरोगी आरोग्यासाठी प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

जागतिक योग दिनानिमित्त लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विशेष योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा प्रशासन, लातूर शहर महानगरपालिका, पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जगातील सुमारे १७० देशांनी योगाचे महत्त्व ओळखून त्याचा स्वीकार केला आ हे. त्यामुळेच २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जात असल्याचे सांगून जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले की, शा रीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान एक तास योगाभ्यास केला पाहिजे. तसेच आरोग्यासोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी केले.

या प्रसंगी योग शिक्षक विष्णू भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासने आणि प्राणायाम केला. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाने निश्र्चित केलेल्या योग शिष्टाचारानुसार प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, सृष्टी जगताप तसेच पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, मारवाडी राजस्थान माध्यमिक विद्यालय, बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, देशिकेंद्र माध्यमिक विद्यालय आणि राजमाता जिजामाता माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी प्रास्ताविक केले. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध विशेष कार्यक्रमांचे व योगाभ्यास सत्रांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी प्रास्ताविकात दिली.

## वादळ वाऱ्याने निकम कुटुंबीयांचा संसार उध्वस्त

### आ. रमेशआप्पा कराड यांनी संपूर्ण साहित्य देऊन आधार दिला




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन लातूर ग्रामीणच्या भादा सर्कल मधील मौजे वानवडा येथील अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे संपूर्ण घर आणि घरालगत असलेल्या व्यवसायाचे संपूर्ण नुकसान होऊन निकम कुटुंबीय उध्वस्त झाल्याने लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी तात्काळ सदर कुटुंबीयास संसार उपयोगी साहित्यासह सर्व प्रकारची मदत केली.

अद्यापही मृगाचा पाऊस झाला नाही सर्वजण पावसाची वाट पाहत असतानाच शनिवारी अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या भादा सर्कलमधील मौजे वानवडा येथे झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि वादळ वाऱ्यामुळे अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे घरासह घराच्या परिसरात थाटलेल्या किराणा दुकान, पानटपरी आणि आरो प्लांट या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले. अत्यंत गरीब असलेल्या निकम कुटुंबीयांनी कष्टातून छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून आपली उपजिविका भागवत असतानाच अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे घरावरील संपूर्ण पत्र्याचे शेड उखडून गेले. साईडच्या भिंती जमीन दोस्त झाल्याने अनेक वस्तूची मोडतोड झाली. अवकाळी पावसाने अन्नधान्य, कपडे, अंथरून पांघरून भिजून गले. संसार उपयोगी भांडीकुंडीसह सर्व प्रकारच्या वस्तू आणि साहित्याची दयनीय अवस्था निर्माण झाली तर किराणा दुकानासह पानटपरी बरोबरच अत्यंत मेहनतीतून आणि कष्टातून उभारलेला आरो प्लांट (शुद्ध पाणीपुरवठा) छोटासा व्यवसाय उध्वस्त झाला.

या नैसर्गिक आपत्तीत उघड्यावर आलेल्या निकम कुटुंबीयांना लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी मोठा आधार दिला. भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयात कदम कुटुंबीयातील सुमनबाई काशिनाथ निकम व त्यांचा मुलगा बळीराम निकम यांना आ. रमेशआप्पा कराड यांनी संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडीकुंडी व इतर साहित्यसह दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून पांघरून यासह तात्काळ लागणारे अन्नधान्य देऊन मोठा आधार दिला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, रेणापूर तालुका संगायो अध्यक्ष सतिश आंबेकर, वानवडा येथील सरपंच फुलचंद अंधारे, उपसरपंच दीपक काळे, लिंबराज सोमवंशी, राजेंद्र घोडके, नितीन अंधारे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती. आ. रमेशआप्पा कराड यांनी तातडीने मदत देऊन मोठा आधार दिल्याबद्दल निकम कुटुंबीयांनी यावेळी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमर राजुरकर यांची विजयाची हॅट्रीक

**तभा वृतसेवा**
**नादेड, दि. २२ जुन -**

नांदेड विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी दणदणीत विजय प्राप्त केला आहे. राजूरकर यांनी विधान परिषद निवडणुकीत विजयाची हॅट्रिक साधली आहे असे करणारे ते जिल्ह्यातील पहिलेच राजकारणी ठरले आहेत. राजूरकर यांचा हा विजय अपेक्षित असला तरीही आता काँग्रेससह वंचित बहुजन आघाडी आणि इतर कोणकोणत्या पक्षाची मते भाजपाला मिळाली याची चर्चा नांदेडमध्ये सुरू झाली आहे. राजुरकर यांना या निवडणुकीत ३३९ मते मिळाली आहेत तर महाविकास आघाडीने पुरस्कृत केलेल्या कृष्णा आष्टीकर यांना ८४ मते प्राप्त झाले. वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले यांना केवळ पाच मते मिळाली आहेत.



ठाकरे सेनेतून शिंदे सेनेत प्रवेश केलेल्या खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या चिरंजीवाला ऐन निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेसने आपला स्वतःचा उमेदवार मागे घेऊन पुरस्कृत केले होते. मतदानाच्या एक दिवस आधी खासदार नागेश पाटील आष्टीकर हे शिवसेना शिंदे गटाच्या तंबूत पोहोचलेले असतानाही काँग्रेसचे नांदेडचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांनी व्हीप काढून कृष्णा पाटील आष्टीकर यांनाच मतदान करण्याचे मतदारांना बजावले होते. त्यामुळे त्यांची ही भूमिका वादात सापडली होती. काँग्रेसचे माघार घेतलेले उमेदवार रामदास सुमठाणकर यांनीही या भूमिकेबद्दल समाजमाध्यमातून प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

# लेंडीचे पाणी कुंद्राळा धरणात लिफ्ट करा : मुखेड तालुका विकास समिती

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २२ जुन -**

मुखेड तालुक्यातील बहुचर्चित लेंडी प्रकल्प पुर्ण होत असुन या प्रकल्पातील पाणी लिफ्ट करून कुंद्राळा मध्यम प्रकल्पात टाकण्याची मागणी मुखेड तालुका विकास समितीच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे.



तालुक्यातील रावणगाव येथिल लेंडी प्रकल्पाचे काम पुर्ण होत असुन यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून आपल्या वडीलोपार्जीत जमिनी प्रकल्पाला दिल्या. त्यामुळे प्रकल्प मार्गी लागला असून या प्रकल्पात येणारे पाणी हे धरणाच्या वरच्या भागातील लोकांच्या हक्काचे असून ते पाणी उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून वापरण्याचा त्यांचा हक्कच आहे.त्यामुळे प्रकल्पाच्या बॅकवॉटर क्षेत्रात असलेल्या कुंद्राळा मध्यम प्रकल्पात आणून टाकल्यास तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शेती सिंचनाखाली येणार आहे. त्यासोबत तालुक्यातील अनेक गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटणार आहे. सध्या कुंद्राळा धरणातील पाण्याचा वापर शेतीऐवजी पिण्याच्या पाण्यासाठी होत आहे. या धरणात तालुक्यातील १२ गावांतील जल जिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठयाच्या विहीरी खोदण्यात आल्या आहेत .यामध्ये बारा ते पंधरा हजार लोकसंख्या असलेल्या गावासह मुखेड शहराचाही सामावेश आहे .त्यामुळे सिंचनासाठी बांधलेल्या या प्रकल्पातुन केवळ लोकांची तहान भागवण्यासाठी पाण्याचा वापर केला जात असल्याने एके काळी या भागातील शेती व शेतकरी सुजलाम सुफलाम होता मात्र सध्या शेतीसाठी पाणी मिळत नाही. त्यामुळे शेतकरी केवळ खरीप हंगामावर अवलंबून आहे. त्यासाठी याच तालुक्यात पुर्णत्वास येत असलेल्या लेंडी प्रकल्पातील पाणी कुंद्राळा धरणात टाकल्यास शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार असल्याचे मुखेड तालुका विकास समितीचे सक्रिय नेते डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी सांगितले.शनिवारी कुंद्राळा मध्यम प्रकल्पाच्या विश्रामगृह येथे डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

सदरील मागणी ही मागील पंधरा वर्षापासून सुरु असून यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनिल तटकरे यांनी सदरील बाबीची दखल घेत काम करण्याचे अश्वासन दिले होते असेही यावेळी रॅपनवाड यांनी सांगितले .

यावेळी विकास समितीचे कार्याध्यक्ष अरुण महाजन, हणमंत मामा वाडीकर, धोडीराम पाटील अस्वले,व्यंकट पाटील उमाटे , प्रविण काशेटवार , वैजनाथ गुट्टे , संभाजी पाटील, जाकीर शेख, सादक तांबोळी, संजय सोनकांबळे, बळवंत परमाळे, सुभाष गवते दिगंबर फंताडे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते् .



## पीएमश्री जिल्हा परिषद शाळा इस्लापूरमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**इस्लापूर -** भारताच्या प्राचीन योग परंपरेचा गौरव करणारा आंतरराष्ट्रीय योग दिन इस्लापूर येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून साजरा करण्यात आला. योग करा, निरोगी रहा हा संदेश देत विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानसाधनेचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगाभ्यासाने झाली. योग शिक्षक सत्तेश्वर पेशवे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, त्यामागील वैज्ञानिक आधार तसेच नियमित योगाभ्यासामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल व तणावाच्या वाढत्या प्रभावापासून दूर राहून योगाला जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन केले. यावेळी मुख्याध्यापक संजय कराड यांनी योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून ती निरोगी, सकारात्मक आणि संतुलित जीवन जगण्याची कला असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ योगासाठी देऊन उत्तम आरोग्याची जपणूक करावी, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात सुहास माने सर, पांचाळ सर, लासिनकर सर, तिडके सर, नरबाग सर, फुलारी मॅडम, मठपती मॅडम, शेख सुलतान मॅडम, वानखेडे मॅडम आणि टारपे मॅडम यांनी सक्रिय सहभाग घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. संपूर्ण शाळा परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता. विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने योगासने सादर करून उपस्थितांची मने जिंकली. योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचा आणि नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्यदायी समाज घडविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# मेंडका येथील अंगणवाडीत खिचडी अर्धवट शिजलेली, डाळ कच्ची; पोषण आहाराचा बट्ट्याबोळ

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २२ जुन -**

मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील अंगणवाडी केंद्र क्र. ४ मध्ये ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना दिली जाणारी खिचडी ही अर्धवट जळालेली व कच्ची असल्याचा धक्कादायक प्रकार ग्रामस्थांनी उघडकीस आणला आहे. ग्रामस्थांनी मुलांना वाढलेली खिचडी खाली जळालेली आणि वरून कच्ची आणि डाळही नीट शिजलेली नाही.यामुळे मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



सदर खिचडीमध्ये वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या गुणवत्ते बाबत शंका असुन लाभार्थ्यांना मिळणारा आहार हा शासनाच्या निर्धारीत निकषानुसार व दर्जानुसार नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या प्रकरणाची गटविकास अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेवुन अंगणवाडी क्रमांक ४ भिमनगर मेंडका या अंगणवाडी केंद्राचे तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करावी. खिचडी व कच्या मालाचे नमुने तपासणीसाठी पाठवावे. आहार पुरवठा व वितरण प्रक्रियेची सखोल चौकशी करण्यात यावी. लाभार्थी व पालकांचे जबाब नोंदवावे दोषी आढळणाऱ्या संबंधित व्यक्तीवर नियमानुसार कार्यवाही करावी. अशी मागणी मेंडका गावचे उपसरपंच नारायण निखाते, दिनेश निखाते, भिमराव निखाते, सुरज निखाते, प्रथम केळकर, रुतीक गवारे, मनोज नरवाडे,यांनी केली आहे.

# अतिरिक्त शिक्षकांचे जिल्हापरिषदसमोर आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुन -**

शिक्षण संस्था चालकाने मनमानी कारभार करीत नियमबाह्यरित्या दोन सहशिक्षकांना बिंदू नामावलीला डावलत आता रिक्त ठरविले आहे. या दोन सहशिक्षकांनी अन्यायकारक बदली आदेश रद्द करावेत या मागणीसाठी जिल्हा परिषदेसमोर सोमवार दि. २२ जून २०२६ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. हे दोन्ही शिक्षक मागास प्रवर्गातील असल्याने त्यांना अतिरिक्त ठरविल्याचा आरोप उपोषणार्थ्यांनी केला आहे.

राणी लक्ष्मीबाई शिक्षण संस्था यशवंतनगर नांदेड अंतर्गत लोहा तालुक्यातील सावरगाव (न ) येथील शिवनिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे कार्यरत असलेल्या माध्यमिक सहशिक्षिका सोनूताई आबाराव मेंडके या अनुसूचित जमाती प्रवर्गातील तर महेश बाळकिशन फिसके हे इतर मागास प्रवर्गातील आहेत. संस्था संचालिका सिंधुताई टाले यांनी मनमानी कारभार करीत या दोन्ही सहशिक्षकांना प्रथम व द्वितीय यादीमध्ये यांची नावे नसताना देखील नियमबाह्यरित्या अतिरिक्त ठरवित आहे.

सहशिक्षिका सोनूताई आबाराव मेंडके या अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती झालेल्या असल्याने त्यांना अतिरिक्त केल्याने महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी ( सेवाशर्ती) नियमावली १९८१ चे नियम क्र. ९ पोट कलम ( ७ ) व नियम २७ नुसार बिंदू नामावलीचे पालन करण्यात आले नसल्याचे उपोषणार्थीनी शिक्षणाधिकाऱ्यांना निदर्शनास आणून दिले आहे. सदर नियमबाह्यरित्या अतिरिक्त ठरवून देण्यात आलेले बदली आदेश रद्द करण्याच्या मागणीसाठी सहशिक्षिका सोनूताई मेंडके व महेश फिसके आमरण उपोषण करीत आहेत.

# सारखणी येथे १ जुलै रोजी महाआरोग्य शिबिर; खा. डॉ. श्रीकांत शिंदे राहणार उपस्थित

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २२ जुन -**

किनवट तालुक्यातील युवा नेतृत्व व माजी जिल्हा परिषद सदस्य विशाल जाधव यांनी नुकताच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला आहे. पक्ष प्रवेशानंतर त्यांनी किनवट व माहूर विधानसभा क्षेत्रात शिवसेना संघटन बळकटीकरणास सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत कार्याला सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दि. १ जुलै रोजी किनवट तालुक्यातील सारखणी येथे भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात विविध आजारांचे निदान, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, तपासण्या व आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




या महाआरोग्य शिबिरास शिवसेना नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे प्रमुख उपस्थिती लावणार असून, त्यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. शिवसेना पक्षाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून मुंबई येथे दि. १९ जून रोजी या महाआरोग्य शिबिराच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी शिवसेना राज्य सचिव संजय मोरे, ठाण्याचे माजी खासदार आनंद परांजपे, नांदेड जिल्हा सचिव मनोज तिरमनवार, किनवट तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, माहूर तालुका प्रमुख सुदर्शन नाईक तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य विशाल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. तसेच आगामी काळात शिवसेनेच्या माध्यमातून सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक व जनहिताच्या विविध उपक्रमांची मालिका राबविण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.सारखणी येथे होणाऱ्या या महाआरोग्य शिबिराचा लाभ किनवट, माहूर तसेच परिसरातील हजारो नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. विशाल जाधव यांच्या पुढाकारामुळे या उपक्रमाबाबत तालुक्यात उत्सुकता निर्माण झाली असून, शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला देखील या कार्यक्रमातून चालना मिळणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# अन्न सुरक्षा विभागाच्या 'आशीर्वादा'ने नायगाव तालुक्यात गुटख्याचा धंदा तेजीत?

**गोविंद नरसीकर**
**नरसी, दि. २२ जुन -**

राज्य शासनाने गुटखा विक्रीवर बंदी घालून अनेक वर्षे उलटली असली, तरी नायगाव तालुक्यात ही बंदी केवळ कागदोपत्रीच असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. नायगाव, नरसीसह तालुक्यातील अनेक गावांमध्ये पानटपऱ्या, किराणा दुकाने, हॉटेल्स आणि इतर व्यावसायिक आस्थापनांतून खुलेआम गुटखा विक्री सुरू असल्याने अन्न सुरक्षा विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

तालुक्यातील नरसी, नायगाव येथील मुख्य चौक, बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी गुटखा सहज उपलब्ध होत असताना संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांना ही बाब दिसत नाही का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी गुटखा विक्री इतक्या बिनधास्तपणे सुरू आहे की, जणू काही या अवैध व्यवसायाला प्रशासनाचेच अभय मिळाले आहे, अशी चर्चा सर्वसामान्यांमध्ये रंगू लागली आहे.

युवक वर्ग आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये गुटखा व मावा सेवनाचे वाढते प्रमाण ही चिंतेची बाब ठरत आहे. व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकणाऱ्या तरुणांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असतानाही संबंधित यंत्रणा मात्र मूग गिळून गप्प असल्याचा आरोप होत आहे. कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांना कारणीभूत ठरणाऱ्या पदार्थांची विक्री रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, तालुक्यातील काही भागांत दरमहा ठराविक 'व्यवस्था' होत असल्यामुळेच गुटखा विक्रेत्यांवर प्रभावी कारवाई होत नाही. त्यामुळे अवैध धंदेवाल्यांचे मनोबल वाढले असून गुटख्याचा काळाबाजार



दिवसेंदिवस फोफावत आहे. या चर्चांमुळे अन्न सुरक्षा विभागाची प्रतिमा मलिन होत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

पोलीस विभागाकडून वेळोवेळी कारवाई होत असली, तरी संबंधित अन्न सुरक्षा विभागाकडून सातत्यपूर्ण आणि प्रभावी मोहिम राबविली जात नसल्याचा आरोप होत आहे. ज्या भागांत रोज गुटखा विक्री सुरू असते, तेथे नियमित तपासणी का होत नाही, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत.

नागरिकांनी जिल्हाधिकारी, अन्न व औषध प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित विभागाच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी नायगाव तालुक्यातील गुटखा विक्रीची सखोल चौकशी करावी, हप्ता वसुलीच्या चर्चांची पडताळणी करावी, तसेच अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

**गुटखा विक्रेते निर्धास्त, प्रशासन मात्र मस्त?**

गावोगावी आणि चौकाचौकांत गुटखा सहज उपलब्ध होत असताना संबंधित विभागाची कारवाई मात्र अद्याप दिसून येत नाही. त्यामुळे बंदी असलेल्या गुटख्याचा व्यवसाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे. प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलली नाहीत तर युवकांचे आरोग्य धोक्यात आणणारा हा अवैध व्यवसाय आणखी बळावण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# एसजीजीएस संस्थेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २२ जुन -**

एसजीजीएस संस्थेत आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सकाळी ७ वाजता संस्थेच्या बास्केटबॉल कोर्टावर विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.योगतज्ज्ञ डॉ. लेलीना एस. व्ही. बी., डॉ. आर. एस. भालेकर, डॉ. अंकुश सावकर तसेच श्री. शिवाजी शिंदे यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि निरोगी जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, योग ही केवळ व्यायामपद्धती नसून निरोगी, संतुलित आणि आनंदी



जीवन जगण्याची प्रभावी जीवनशैली आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवून निरोगी व सकारात्मक जीवनाचा स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. माधव वैद्य, प्रथम वर्ष समन्वयक डॉ. किरण सानप, विविध विभागांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. योग दिनाच्या निमित्ताने संपूर्ण परिसरात आरोग्य, तंदुरुस्ती आणि सकारात्मकतेचा संदेश देणारे प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा प्रभारी भास्कर कदम तसेच क्रीडा विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पंचशील विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ जुन -**

शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरणप्रेमी शाळेचे माजी मुख्याध्यापक एन.व्ही.कदम आणि शहरातील माऊली हॉस्पिटलच्या संचालिका योग प्रशिक्षिका डॉ. जयश्री पवार यांनी आपले आरोग्य आणि योगा या विषयी मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक दाखवत नियमित योग,प्राणायाम केल्याने आपले शरीर आरोग्याच्या दृष्टीने कसे तंदुरुस्त राहते हे पटवून देताना सांगितले की,योगा,प्राणायाम हा



शरीर,मन आणि आत्म्याच्या संतुलनासाठी योगाने दिलेल्या योगदानाबद्दल कर्तज्ञता व्यक्त करण्याचा एक प्रतीकात्मक मार्ग आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगा प्रणायाम करून निरोगी,शांत आणि सकारात्मक जीवनाचा संकल्प केला जातो असे सांगून दोघांनी ही विद्यार्थी व शिक्षकांना प्रात्यक्षिक करून दाखविले.

याप्रसंगी मुख्याध्यापक दस्तूरकर यांनी योग प्रशिक्षक नारायणराव कदम यांचा तर शाळेतील शिक्षिका श्रीमती जयश्री चंदापुरे यांनी डॉ.सौ. जयश्री पवार यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तक भेट देऊन सत्कार केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योग प्रशिक्षक राहुल वाठोरे यांनी तर उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे मुख्याध्यापक दस्तूरकर यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक जाधव,बेळकुंदे,परीक्षा प्रमुख ओमकार मुधोळ यांनी परिश्रम घेतले.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शंकर रामराव पावडे, रा. वाडी. बु. ता. जि. नांदेड यांनी मौ. वाडी बु. ता.जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर. जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. वाडी बु. ता.जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शिवाजी रामराव पावडे, रा. वाडी.बु. ता. जि. नांदेड यांनी मौ. वाडी बु. ता.जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. वाडी बु. ता.जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. गजानन मारोतराव पावडे, रा. वाडी. बु. ता. जि.नांदेड यांनी मौ. वाडी बु. ता.जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. वाडी बु. ता.जि.नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. राजेश मारोतराव पावडे, रा. वाडी.बु. ता. जि. नांदेड यांनी मौ. वाडी बु. ता. जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. वाडी बु. ता.जि. नांदेड सर्वे नं. ५६/क क्षेत्र ०.३१ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**